पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ● वर्ष १६ ● अंक ८४ ● बुधवार, दि ३० सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. ht

**सुविचार**

यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो. कठोर परिश्रम हाच यशाचा हमखास रस्ता आहे.



## अकोल्याचा सर्वांगीण विकासासोबत
# दुष्काळी परिस्थितीत शेतकरी कल्याणावर सर्वाधिक लक्ष
# जिल्हाधिकारी वर्षा मिना यांची ग्वाही!

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** महाराष्ट्रातील प्रमुख शहर म्हणून झपाट्याने विकसित होत असलेल्या अकोला जिल्ह्यात सध्या प्रशासकीय पातळीवर एक सकारात्मक आणि ऊर्जावान पर्व सुरू आहे. जिल्ह्याची धुरा सांभाळणाऱ्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आपल्या अवाढव्य प्रशासकीय अनुभवाच्या आणि दूरदर्शी दृष्टिकोनाच्या जोरावर अकोल्याच्या विकासाला नवी गती दिली आहे.जिल्हाधिकारी वर्षा मिना यांनी दूष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना शेती व्यतिरिक्त इतर उत्पन्नाच्या स्त्रोतांचा विचार करत त्यावर कार्य करण्यावर भर दिला आहे.

दूष्काळी परिस्थितीत जिल्हा प्रशासन पुर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठिशी असून विशेषतः शेतकरी सक्षमीकरणासाठी विविध योजनांची माहिती त्यांनी आर आर सी ला दिलेल्या विशेष मुलाखती स्पष्टपणे अधोरेखित केल्या. लवकरच ही संपुर्ण मुलाखत आर आर सी न्यूजच्या विविध सोशल मिडिया प्लॅटफार्मवर प्रसारीत होईल.आर आर सी च्या वर्धापन दिनानिमित्त आर आर सी चे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी वर्षा मिना यांचे आर आर सी च्या स्टुडीओत स्वागत करत स्मृतीचिन्हं देत जिल्हाधिकाऱ्यांचा सन्मान केला. पाणी टंचाईत जनतेला पाण्याची बचत करावी लागणार आहे. असे ही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना सर्वपरी मदत, अत्यंत पारदर्शक आणि निर्दोष 'एसआयआर' प्रक्रियेची अंमलबजावणी तसेच ग्रामीण व शहरी भागातील तरुणांसाठी क्रीडा संस्कृतीला दिलेले बळ या तिन्ही आघाड्यांवर जिल्हा प्रशासनाने उत्तम कामगिरी केली आहे. या सर्वसमावेशक कारभारामुळे अकोला जिल्हा आता राज्यासाठी एक नवा आदर्श ठरत आहे.





### जिल्ह्यात क्रीडा संस्कृतीचे कौतुक

स्वतः एक उत्कृष्ट व्हॉलीबॉल खेळाडू आणि आयआयटी रुडकीच्या सुवर्णपदक विजेता कर्णधार राहिलेल्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी क्रीडा संस्कृतीला पुनरुज्जीवन दिले आहे. अकोला हे आधीपासूनच क्रीडा क्षेत्राचे हब असून, राज्यस्तरीय स्पर्धा येथे यशस्वीपणे होस्ट केल्या जात आहेत. तालुका स्तरावर क्रीडा संकुलांच्या इन्फ्रâास्ट्रक्चरच्या विकासावर भर दिला जात असून, युवकांनी फिटनेससाठी खेळामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा असा संदेश त्यांनी दिला आहे. तसेच यूपीएससीची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या शहरां किंवा महागड्या कोचिंग क्लासेसचे दडपण न घेता आत्मविश्वासाने 'सेल्फ स्टडी' करावी, असा मोलाचा कानमंत्र त्यांनी तरुणांना दिला आहे.

### एसआयआर ची अचूक नोंदणी

लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाची असणारी निवडणूक प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम' (एसआयआर) हाती घेतला आहे. ड्राफ्ट इलेक्टोरल रोल प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या नागरिकांच्या नावांमध्ये त्रुटी आहेत किंवा जे नवीन मतदार आहेत, त्यांना बीएलओ आणि ईआरओमार्फत नोटीसेस देऊन सुनावणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जात आहे. जवळपास दोन लाख नागरिकांच्या कागदपत्रांची पडताळणी करून अंतिम व निर्दोष मतदार यादी तयार करण्याच्या या प्रक्रियेत प्रशासनाने उच्च दर्जाची पारदर्शकता राखली आहे.

### प्रशासकीय सुसंवाद आणि विकासाची नवी क्षितिजे

अकोला जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेतला असता, येथे केवळ शासकीय योजना कागदावर न राबवता तळागाळापर्यंत कशा पोहोचवल्या जात आहेत, हे स्पष्ट होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी जालना येथील यशस्वी अनुभवाचा आणि प्रशासकीय कौशल्याचा पुरेपूर वापर अकोल्यात केला आहे. जिल्ह्यामध्ये शेतकरी वर्गासाठी 'फार्मर आयडी' काढण्याची मोहीम अत्यंत वेगाने राबवली जात आहे, ज्यामुळे कृषी क्षेत्रातील योजनांची अंमलबजावणी सुलभ झाली आहे. तसेच महिला शेतकऱ्यांसाठी विशेष ओळखपत्र मोहिमेअंतर्गत २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांची नोंदणी सुकर करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले जात आहे. आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील सुमारे ७० टक्के नागरिकांना ५ लाखांपर्यंतच्या मोफत आरोग्य विम्याचा लाभ मिळाला असून आरोग्य क्षेत्रातही जिल्ह्याने मोठी मजल मारली आहे.

### पायाभूत सुविधांच्या विकासावर भर

अकोला म्हणजे रेल्वेची उत्तम कनेक्टिव्हिटी, शिवनी विमानतळाचे आगामी काळात पूर्ण होत असलेले भूसंपादन आणि एमआयडीसीमधील प्रशिक्षित मॅन पॉवरमुळे औद्योगिक विकासाला आलेली नवी उभारी हे अकोल्यासाठी प्लस पाईंट ठरत आहे. असा दावा जिल्हाधिकारी वर्षा मिना यांनी आर जे अजिंक्य यांना दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले. ऐतिहासिक नरनाळा व असदगड किल्ल्यांच्या माध्यमातून पर्यटनाला मिळत चाललेली चालना यावरून अकोल्याचे भविष्य उज्ज्वल असल्याचे स्पष्ट होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि प्रशासकीय व नागरिकांच्या भक्कम समन्वयाने अकोला जिल्हा आता विकासाच्या एका नव्या शिखरावर पोहोचत आहे. हा विकास केवळ भौतिक नसून तो मानवी संसाधनांना आणि लोकशाही मूल्यांना बळ देणारा ठरत असून, अकोल्याची ही यशस्वी घोडदौड संपूर्ण महाराष्ट्रासाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

## »थोडक्यात

### टाटा ट्रस्ट कारभाराची चौकशी करा!

**मुंबई :** गेल्या काही महिन्यांपासून टाटा समूहाबाबत येणाऱ्या वृत्तांमुळे समूहामध्ये काही आलबेल नसल्याचे दिसून येते. त्यातच आता टाटा समूहाच्या अडचणी वाढत चालल्या आहेत. सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्टचे विश्वस्त आणि टाटा सन्स मंडळावरील त्यांचे संयुक्त नामनिर्देशित संचालक वेणू श्रीनिवासन यांनी महाराष्ट्र चॅरिटी कमिशनरला ट्रस्टच्या कामकाजाची आणि प्रशासनाची तत्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी टाटा ट्रस्ट्समधील प्रशासनातील गंभीर त्रुटींचा आरोप करत टाटा सन्सच्या व्यावसायिक बाबींमध्ये धर्मादाय ट्रस्ट आणि त्याच्या विश्वस्तांच्या सहभागाबाबत चिंता व्यक्त केली.

---

### ठाण्यात उद्धवसेनेच्या विभागप्रमुखाची हत्या!

**मुंबई :** उद्धवसेनेचे ठाण्यामधील विभाग प्रमुख प्रदीप पूर्णेकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. पूर्णेकर यांच्यावर मानपाडा परिसरातील कार्यालयात गोळीबार करण्यात आला होता. या गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या पूर्णेकर यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतलं असून, हल्ल्यामध्ये एकूण पाच जणांचा सहभाग होता, असा पोलिसांना संशय आहे.

---

### तब्बल १ दशकानंतर माजी मुख्यमंत्री पुन्हा काँग्रेसच्या वाटेवर!

गांधीनगर : गुजरातचे माजी मुख्यमंत्री शंकरसिंह वाघेला तब्बल १ दशकानंतर पुन्हा एकदा काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. ८६ वर्षीय वाघेला यांनी सत्ताधारी भाजपाविरोधात रणशिंग फुंकलं आहे. पक्षात कुठलेही पद अथवा वैयक्तिक स्वार्थाची अपेक्षा नाही, परंतु आपल्या अनुभवाने विरोधी पक्षाला मजबूत करण्याची इच्छा आहे, असे वाघेला यांनी स्पष्ट सांगितले. त्यामुळे २०२७ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपाला मोठा झटका बसण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे प्रभारी रणदीप सिंह सुरजेवाला, प्रदेशाध्यक्ष अमित चावडा आणि माजी केंद्रीय मंत्री भरतसिंह सोलंकी यांच्यासोबत महत्त्वाची बैठक पार पडली. त्यांनीही वाघेला यांची घरवापसी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासोबत समोरासमोर बैठकीनंतर निश्चित होईल असं सांगितले.

# सचिन वाझेची आज पुण्याला रवानगी होण्याची शक्यता!

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



मुंबई : उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली स्कॉर्पिओ गाडी ठेवणे आणि व्यापारी मनसुख हिरेन यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेला बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे याला विशेष सत्र न्यायालयाने अखेर सशर्त जामीन मंजूर केला आहे. या निर्णयामुळे तब्बल साडेपाच वर्षांनंतर सचिन वाझे तुरुंगातून बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, न्यायालयाने त्याला अत्यंत कडक अटी-शर्ती घातल्या असून मुंबई, ठाण्यासह तब्बल ५ जिल्ह्यांत प्रवेश करण्यास सक्त मनाई केली आहे. त्यामुळे सुटकेनंतर वाझेचा पुढील मुक्काम थेट पुण्यात असणार आहे. दरम्यान, या जामिनाला स्थगिती मिळवण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) उच्च न्यायालयात धाव घेतली असून, दुसरीकडे दिशा सालियान मृत्यू प्रकरणात सुरू असलेल्या दाव्यांवर वाझेने स्वतः न्यायालयात अर्ज सादर करून मोठी खळबळ उडवून दिली आहे.

विशेष सत्र न्यायालयाने जामीन मंजूर करताना स्पष्ट केले की, जामीन मिळणे म्हणजे गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता नव्हे; या प्रकरणातील पुराव्यांची अंतिम तपासणी खटल्यादरम्यानच होईल. न्यायालयाने खालील अटी निश्चित केल्या आहेत. सचिन वाझेला मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर या ५ जिल्ह्यांमध्ये राहण्यास किंवा प्रवेश करण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. केवळ न्यायालयातील प्रत्यक्ष सुनावणीसाठी हजर राहण्यापुरतीच त्याला या जिल्ह्यांत येण्याची मुभा असेल. जामीन आदेशानंतर ७ दिवसांच्या आत मुंबईबाहेर राहण्याच्या ठिकाणाचा अधिकृत पत्ता देण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार वाझेने आपण पुण्यात राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १ लाख रुपयांचा वैयक्तिक रोख बाँड आणि १ स्थानिक जामीनदार देण्याची अट घालण्यात आली आहे.

# अकोला बाजार समितीत रेशनच्या धान्याचा काळाबाजार!

## सरकारी गोण्यांमधून ज्वारी खुल्या बाजारात !

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** राशन माफियांच्या बेकायदेशीर कारनाम्यानंतर आता अकोल्यात थेट 'ज्वारी माफियांची' चलती पाहायला मिळत आहे. गरिबांना वाटपासाठी असलेल्या शासकीय रेशनचा माल थेट कृषी उत्पन्न बाजार समितीत (एपीएमसी) पोहोचवून विकला जात असल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. शासकीय धान्याची १८ रुपयांमध्ये ज्वारी खरेदी करत ३८ रुपयांत विकण्याचा उद्योग अकोल्यात सुरु आहे. असे असताना यासर्व गोष्टींकडे पुरवठा विभागाचे दूर्लक्ष का अशी विचारणा होत आहे.

या संपूर्ण काळाबाजाराचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला असून, संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.व्हायरल झालेल्या व्हिडिओनुसार, एका ऑटोरिक्षामधून सरकारी रेशनच्या गोण्यांमधील ज्वारी अकोला बाजार समितीतील दोन अडत दुकानांवर उतरवला जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, हा रेशनचा माल थेट शेतकऱ्यांच्या नावे खपवण्यासाठी इतर शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यांचा गैरवापर केला जात असल्याची जोरदार चर्चा व्यापारात सुरू आहे. सर्वसामान्य रेशनकार्डधारकांच्या हक्काचा धान्यसाठा स्वस्त धान्य दुकानातून वळवून,



व्यापाऱ्यांमार्फत खुल्या बाजारात दुप्पट भावाने विकला जात आहे. या संपूर्ण प्रकारामुळे शासकीय धान्य वितरण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, यात जिल्हा पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचे अभय किंवा आशीर्वाद आहेत का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दोषींचे परवाने रद्द करण्याची मागणीया धक्कादायक प्रकरणानंतर अकोल्यातील नागरिक आणि शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत.

प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन व्हायरल व्हिडिओ, रेशनच्या गोण्या, अडत दुकानांमधील स्टॉक रेकॉर्ड आणि संशयास्पद ७/१२ उताऱ्यांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी केली जात आहे. तसेच, या काळाबाजारात सहभागी असलेल्या अडत दुकानदारांचे परवाने कायमचे रद्द करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे.

# सरकारी अधिकारी हे जनतेचे सेवक, मालक नाहीत!

## हायकोर्ट : सरकारी अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारावर रोष

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**नागपूर :** नागरिकांचे अर्ज आणि निवेदने वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याच्या ढिसाळ कारभारावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कडक शब्दात ताशेरे ओढत फटकारले आहे. सरकारी अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत, मालक नाहीत, असे म्हणत उच्च न्यायालयाकडून संताप व्यक्त करण्यात आला आहे.

याचिकाकर्ते दिलीप ठाकरे यांनी सेवाविषयक मागणीसाठी २०१८ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत नागपूर विभागीय आयुक्त आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अनेक निवेदने दिली होती. अशातच तब्बल सहा वर्षे उलटूनही त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आल्या नाही. त्यामुळे त्यांना उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. दरम्यान, न्यायालयाने ३१ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रामविकास विभागाच्या मुख्य सचिवांना या प्रकरणी स्वतः चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. परंतु सचिवांनी ज्यांच्यावर आरोप होते त्याच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना



चौकशी करण्याचे निर्देश दिले. सचिवाचे या ढिसाळ कारभारावर न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला. न्यायालयाने अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढत अधिकारी वेळेत काम करत नसल्याने नागरिकांना न्यायालयात धाव घ्यावी लागते. अशा याचिकेमुळे न्यायालयाचा मोठा वेळ वाया जातो.

### चेंबूर झोपु प्रकल्पावर हायकोर्टाचे ताशेरे

सरकारी जमिनीवरील अतिक्रमणानंतर सरकारने निष्क्रिय राहणे अपेक्षित नाही, असे म्हणत चेंबूर झोपु प्रकल्पावर हायकोर्टाने ताशेरे ओढले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण आणि पुनर्विकासाची जबाबदारी सरकारची असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. चेंबूरमधील सुमारे ६६ हजार चौ.मी. सरकारी जमिनीवरील झोपु प्रकल्प तब्बल २० वर्षांपासून रखडला आहे. २००६ पासून प्रयत्न सुरू असून अद्याप पुनर्विकासाची एकही वीट रचली गेली नाही. ?सार्वजनिक जमिनींवर सर्रास अतिक्रमण होऊ दिल्यानंतर सरकार किंवा संबंधित प्राधिकरणांनी मूक प्रेक्षक बनून राहणे वेदनादायी आणि चिंताजनक असल्याची परखड टिप्पणी न्यायालयाने केली आहे. खासगी विकासकांच्या व्यावसायिक वादांमुळे सरकारी जमिनीवरील प्रकल्प वर्षानुवर्षे रखडणे अयोग्य असल्याचे निरीक्षण हायकोर्टाने नोंदवलं आहे. तर 'निष्क्रिय जमीनमालका'ची भूमिका न घेता सरकारने सक्रियपणे पुढाकार घ्यावा, असे न्यायालयाचे निर्देश आहेत.

# भारताचा आर्चरीत 'सुवर्णवेध'!

## साताऱ्याच्या साहिलने रचला इतिहास

वृत्तसंस्था ३० सप्टेंबर

**टोकियो :** साताऱ्याच्या साहिल राजेश जाधवसह तिरुमुरु गणेश मणिरत्नम आणि कुशल दलाल यांच्या भारतीय पुरुष कंपाउंड संघाने थरारक लढतीत चीनचा पराभव करत सुवर्ण पदकावर नाव कोरले. हे भारताचे आजच्या दिवसातील तिरंदाजीतील तिसरे पदक ठरले. नीरू धांडानेही आजचे दुसरे सुवर्णपदक जिंकले आहे. या कामगिरीसह भारताने आजच्या दिवसात आतापर्यंत चार सुवर्णपदके पटकावली. आशियाई



क्रीडा स्पर्धेत बुधवारी महिला कंपाउंड प्रकारातील तिरंदाजीत भारताने सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर साताऱ्याच्या साहिल जाधवने चिकिता तनीपर्थीच्या साथीने मिक्स कंपाउंड प्रकारात दक्षिण कोरियाच्या संघाचा पराभव करत सुवर्णपदक जिंकले. आता पुरुष संघासोबतही सुवर्णपदक पटकावत साहिलने आपले दुसरे सुवर्ण जिंकले असून, भारताच्या तिरंदाजीतील गोल्डन हॅटट्रिकमध्ये त्याने मोलाचा वाटा उचलला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील आर्चरीतील दमदार कामगिरीच्या जोरावर भारताने सुवर्णपदकांच्या रकान्यात दुहेरी आकडा गाठत पदकतालिकेत मोठी झेप घेतली आहे. भारताच्या खात्यात आता १० सुवर्ण, २१ रौप्य आणि २८ कांस्य अशी एकूण ५९ पदके जमा झाली असून, भारत सातव्या स्थानावर पोहोचला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट संमिश्र २
बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# चान्नी पोलिसांची मध्यरात्री शोधमोहीम; लोणारमध्ये अल्पवयीन मुलीचा शोध

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**पातूर :** पोलीस स्टेशन चान्नी अंतर्गत एका अल्पवयीन मुलीला फूस लावून घेऊन गेल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर चान्नी पोलिसांनी प्रकरण गांभीर्याने घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अकोला स्थानिक गुन्हे शाखा आणि चान्नी पोलिसांच्या संयुक्त पथकाने रात्रभर शोधमोहीम राबवत अखेर लोणार येथील घरकुलजवळील पट्टी परिसरातून मुलीचा सुरक्षित शोध घेतला.

या प्रकरणी चान्नी पोलीस स्टेशन येथे २५ सप्टेंबर २०२६ रोजी अप.क्र. ३४१/२०२६, कलम १३७(२) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुलीचे आई-वडील गुराढोरांची देखभाल तसेच अन्य कामे करून उदरनिर्वाह करतात. मुलगीही त्यांच्यासोबत राहत होती. २५ सप्टेंबर रोजी ती अचानक बेपत्ता झाल्यानंतर पालकांनी परिसरात तसेच परिचितांकडे तिचा शोध घेतला. मात्र, बराच शोध घेऊनही मुलीचा ठावठिकाणा न लागल्याने त्यांनी चान्नी पोलिसांशी संपर्क साधला. मुलीला कोणीतरी फूस लावून घेऊन गेल्याचा संशय पालकांनी व्यक्त केला होता.

तक्रार प्राप्त होताच चान्नी पोलिसांनी तपास सुरू केला. उपलब्ध माहितीच्या आधारे संभाव्य ठिकाणांचा शोध घेण्यात आला. अकोला स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही तपासात सहभागी झाले. तसेच लोणार पोलीस, परतूर पोलीस व बुलढाणा परिसरातील पथकांची मदत घेऊन संभाव्य ठिकाणी शोधमोहीम राबविण्यात आली.

रात्रभर विविध ठिकाणी शोध घेतल्यानंतर मुलगी लोणार परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने लोणार येथील घरकुलजवळील पट्टी परिसरात शोध सुरू केला. अखेर मुलगी पोलिसांच्या हाती लागली. तिला सुरक्षित ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली. मुलगी सुरक्षित सापडल्याची माहिती मिळताच तिच्या आई-वडिलांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

या प्रकरणात पोलिसांनी शांताराम अश्रू कराळे (४०, रा. लोणार), अनुसया गुणाजी साखरकर (४०, रा. वढव, लोणार) आणि चंद्रकला देविदास कोकाटे (५०, रा. आदर्श गोरक्षण संस्था, आलेगाव) यांना ताब्यात घेतले आहे. तसेच घटनेत सहभागी असल्याचा संशय असलेल्या एका विधीसंघर्षग्रस्त बालकासही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, बाळापूर पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

परि. पोलीस उपअधीक्षक तथा प्रभारी अधिकारी, चान्नी पोलीस स्टेशन धनराज देवर्जनकर, अकोला स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी तसेच लोणार पोलीस, परतूर पोलीस आणि बुलढाणा पथकाने या शोधमोहीमेत महत्त्वाची भूमिका बजावली.

# 'वंदे मातरम्'च्या 150 वर्षपूर्तीनिमित्त श्री संताजी विद्यालयात राष्ट्रभक्तीचा जागर

प्रतिनिधी ३० सप्टेंबर




अकोला : "वंदे मातरम्!" या मंत्रघोषाने परिसर दुमदुमला आणि विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत अधिक प्रज्वलित झाली. विद्याभारती अखील भारतीय शिक्षा संस्थान नई दिल्ली व्दारा विद्याभारती विदर्भ सलग्नित श्री समर्थ शिशुवाटिका व श्री संताजी इंग्लिश प्रायमरी, मिडल स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज, अकोला येथे 'वंदे मातरम्' गीताच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त राष्ट्रभक्तीपर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किशोर फुलकर अध्यक्ष श्री गजानन महाराज मंदीर शिवनगर, प्रमुख वक्ता महेश जोशी महानगर संपर्क प्रमुख, समीर थोडगे विद्याभारती विदर्भ प्रांत मंत्री, विलास जोशी संघाचे महानगर सेवाप्रमुख, डॉ. प्रमोद श्रावगी सेवार्थ दवाखाना प्रमुख, डॉ. सुनिल घिरणीकर सेवार्थ दवाखाना प्रमुख, सौ. लताताई कुरेकर विद्याभारती महानगर उपाध्यक्ष, निलेश चरपे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक तसेच संस्थेचे अध्यक्ष मंगेश वानखडे जन सखा शिक्षण प्रसारक मंडळचे अध्यक्ष व विद्याभारती प्रांत सदस्य व अकोला महानगर अध्यक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलाने व सरस्वती वंदना घेवुन करण्यात आली. महेश जोशी यांनी 'वंदे मातरम्' गीताचा गौरवशाली इतिहास, त्यामागील राष्ट्रभावना, स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे महत्त्व आणि गेल्या १५० वर्षांत या गीताने भारतीयांच्या मनामध्ये निर्माण केलेली राष्ट्रभक्ती याविषयी विद्यार्थ्यांना, पालकांना व उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक तसेच मुख्याधपिका, इनचार्ज, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरीक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाने संपूर्ण वातावरण राष्ट्रभक्तीने भारावून गेले. कार्यक्रमाचे संयुक्त सूत्रसंचालन श्रद्धा गौड व वैष्णवी उजगावकर यांनी प्रभावीपणे केले. सेजल सिरसाटने आभार मानले.

# सणासुदीत अकोलामार्गे नांदेड-उधना विशेष रेल्वे

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** सणासुदीच्या काळात प्रवाशांची वाढणारी गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे विविध मार्गावर साप्ताहिक विशेष रेल्वेगाड्या चालविण्यात येणार आहेत. यामध्ये हजूर साहिब नांदेड-उधना-हजूर साहिब नांदेड विशेष गाडी अकोला मार्गे धावणार असल्याने अकोला व परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. हजूर साहिब नांदेड-उधना विशेष दर सोमवारी, 5 ऑक्टोबर ते 23 नोव्हेंबर या कालावधीत एकूण ४ फेऱ्या करणार आहे. परतीच्या प्रवासात उधना-हजूर साहिब नांदेड विशेष दर मंगळवारी, 6 ऑक्टोबर ते 24 नोव्हेंबर या कालावधीत 8 फेऱ्या करणार आहे. या दोन्ही विशेष गाड्या पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापूर, भुसावळ, जळगाव, धरणगाव, अमळनेर, नंदुरबार आणि व्यारा आदी स्थानकांवर थांबतील. गाडी क्रमांक 07606 ला शेगाव येथेही थांबा देण्यात आला आहे.

# पशुवैद्यकीय दवाखान्यातील कर्मचारी राजू वायकर सेवानिवृत्त



प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**हिवरखेड :** हिवरखेड. येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात कार्यरत असलेले कर्मचारी राजू वायकर हे आज सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने त्यांचे मित्रमंडळी व पशुप्रेमी एकत्र आले होते. यावेळी उपस्थितांच्या वतीने राजूभाऊ वायकर यांचा सन्मान करण्यात आला.

त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने मित्रमंडळी पशुप्रेमींनी सेवेतून निवृत्त होत असताना त्यांच्याप्रती असलेला स्नेह आणि आपुलकी यावेळी व्यक्त केली,

यावेळी उपस्थित जिप उर्दू शाळेचे मुख्याध्यापक नाजीम, अर्जुन खिरोडकार, शाहरुख लाला, अन्सार खा, निखिल कराळे, सुलतान जमादार, जहीर खा, फारुख खा आझाद खा, मुनीर जमदार, समीर कारागीर, अन्वर खा आयुब खा, सय्यद इद्रीस, फैजान खान, मनीष वायकर, आलम सुलतान, सोहेल सुलतान, गौरव पांगधुने अनेक पशुप्रेमी उपस्थित होते.

# पणज श्री महालक्ष्मी यात्रेत भाविकांचा उसळला अलोट जनसागर

प्रतिनिधी ३० सप्टेंबर





**अकोट :** अकोट तालुक्यातील पणज येथील जागृत व पुरातन देवस्थान श्री महालक्ष्मी मातेच्या महाराष्ट्र मध्ये साक्षात्काराने नाव लौकिक आहे दूर दूर वरून येणाऱ्या भाविकांचा यात्रेत शुक्रवारी विशेष महिला भाविकांचा गर्दीचा जनसागर उसळला होता. त्रिवेणी संगमावर स्थित बोर्डी नदीकाठी वसलेल्या शहापूर वाघोळा प्रकल्पाच्या निसर्ग रम्य पाण्याच्या जुन्या रोडवरून दर्शनासाठी येत असताना पुलावरून पाण्याचे निसर्गरम्य वातावरण व मंदिराच्या बाजूला असलेले प्राचीन काळाची दीपमाला हे आजही साक्ष देत आहे भाविकांना मंदिरात येण्याकरिता दोन्ही बाजूने आयोजक समितीकडून नदीच्या किनाऱ्याला लांबलचक दोरांला भगवे झेंडे बांधून सुरक्षा व रस्त्यावर साफसफाई स्वच्छता करून येण्या-जाण्याकरिता रस्ता सुरक्षित तयार होता भाविकांचा दरवर्षीपेक्षा वाढता संख्येचा महापूर वाढता पाहत यावर्षी दर्शन बारी ऊन पाऊस मंडपाची व्यवस्था व पिण्याचे पाण्याची व्यवस्था व आरोग्य विभागाचे डॉक्टरांचा चमू दाखल केले होते पुरातन पौराणिक दरवर्षी गौरी पूजनानिमित्त भव्य यात्रेचे आयोजन केले जाते. पंचक्रोशीतून हजारोच्या संख्येत भाविकांसह माहेरवाशिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन महालक्ष्मी मातेचे दर्शन बारी मध्ये लागून दर्शनाचा लाभ घेत व महाप्रसादाचा

## विविध महिला सेवाधारी गटांचा सहभाग

लांबलचक रांगा लागल्या होत्या यावेळी अत्यंत नियोजनबद्ध महाप्रसादाचे वाटप भाविक तरुण पिढीकडून करण्यात आले व भाविकांना महाप्रसाद हा बसून जेवण करण्यासाठी मोठ्या सभा मंडप ची व्यवस्था केली होती यावेळी मंदिर परिसर मातेच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. मंदिर सभामंडपा समोरील होम विधी मध्ये लहान मुला बाळांना अंगारा हा खूप चमत्कारी ठरतो व बाजूला श्री लक्ष्मी देवी ची मनोकामना पूर्ण करत लक्ष्मी मातेचे मुखवटे कबूल केलेले देवीला दान करतात, मंदिर प्रवेशदराला काही भाविक भक्तांनी काचेचे शिशोभीकरण करून झुंबर फुलांचे हार सजावट करून मंदिराला आणखीच प्रसन्नता आकर्षण वाढले होती यात्रेत आमदार प्रकाश भारसाकळे, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, न्यायाधीश माळी साहेब, ठाणेदार किशोर जुनघरे, यांनी भेटी दिल्या,

यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी ग्रामीण पोलीस व गावकऱ्यांच्या वतीने दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांनी शिस्तबद्ध रीतीने रांगेत उभे राहून दर्शन घेतले. प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या डॉ. राणी लबडे, आरोग्य सेविका सौ. मुळे आणि आशा स्वयंसेविकांनी वैद्यकीय सेवा बजावली. धरणाचे बॅकवॉटर थांबल्यामुळे अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोपटखेड येथील एकलव्य बचाव पथकाने नदीपात्रात सुरक्षा सेवा दिली. अकोट बारगन, विहीगाव, वडाळी देशमुख, अनेक गाव वरून स्वयंपाक पोळ्या कवळ्याची भाजी बनवण्याकरता महिला सेवाधारी मंडळ सेवा देण्याकरता दाखल झाली होती. अंजनगाव येथील महालक्ष्मी दुर्गा उत्सव मंडळ व अकोटच्या विठू माऊली ग्रुपने शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय केली. उपविभागीय पो.अ. निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनात ग्रामीणचे ठाणेदार श्रीधर गुट्टे, यांनी मोठ्या संख्येत पोलीस कडे कोट बंदोबस्त ठेवला सेवा देणाऱ्या सर्व मंडळे व स्वयंसेवकांचा आयोजक मंदिर समिती व ग्रामस्थांतर्फे सत्कार करण्यात आला. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी भाविकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. यात्रेत सर्व समाज बांधवांनी उपस्थिती लावली होती,

# भूमी अभिलेख कार्यालयात खासगी व्यक्तीमार्फत कथित वसुलीचा आरोप

## गजानन राजे यांचा गंभीर आरोप; चौकशीची मागणी

### कार्यालयातील टेबलवर खासगी व्यक्तीचा वावर?

भूमी अभिलेख कार्यालयातील कामकाजाबाबत आरोप करताना गजानन राजे यांनी कार्यालयातील टेबलवर खासगी व्यक्ती बसून नागरिकांची कामे हाताळत असल्याचा आणि त्या माध्यमातून कथित वसुली केली जात असल्याचा आरोप केला आहे. कार्यालयीन कामकाजासाठी अधिकृत अधिकारी-कर्मचारी असताना खासगी व्यक्तीचा अशा प्रकारे वापर होत असल्यास त्याची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. नागरिकांना विविध कामांसाठी कार्यालयात वारंवार जावे लागत असून, काम करून घेण्यासाठी आर्थिक व्यवहाराची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी आपल्याकडे येत असल्याचा दावा राजे यांनी केला. 'लक्ष्मी दर्शनाशिवाय काम होत नाही', अशा स्वरूपाच्या तक्रारी नागरिकांकडून होत असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**मुर्तीजापूर :** शहरातील भूमी अभिलेख कार्यालयाच्या कारभाराबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढत असल्याचा आरोप करीत युवक काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष गजानन नेताजी राजे यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. हक्क नोंद प्रकरणात विलंब केला जात असून, कार्यालयीन कामांसाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्याचबरोबर भूमी अभिलेख कार्यालयातील एका टेबलवर खासगी व्यक्ती बसून नागरिकांकडून कथितरीत्या वसुली करीत असल्याचा गंभीर आरोप राजे यांनी केला आहे. राजे यांनी भूमी अभिलेख कार्यालय, मुर्तीजापूर येथील उपअधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुर्तीजापूर शहर नझूल शीट क्र. १०-बी मधील प्लॉट क्र. ६८ तसेच नझूल शीट क्र. १०-डी मधील प्लॉट क्र. ७ यांच्या हक्क नोंदीसाठी ७ जुलै २०२६ रोजी अर्ज करण्यात आला होता. मात्र, त्यानंतर कार्यालयात अनेकदा चकरा मारूनही संबंधित हक्क नोंद करण्यात आली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

**हक्क नोंदीचा प्रश्न ऐरणीवर**

हक्क नोंद करण्यासाठी अर्ज करूनही प्रकरण प्रलंबित ठेवले जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होत असल्याचे राजे यांनी म्हटले आहे. कार्यालयीन प्रक्रियेत काही त्रुटी असल्यास त्या स्पष्टपणे नागरिकांना सांगणे आणि नियमानुसार प्रकरणांचा वेळेत निपटारा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

"भूमी अभिलेख कार्यालयाच्या माध्यमातून मुर्तीजापूरकरांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. अनेक नागरिक तक्रारी घेऊन कार्यालयात येतात; मात्र त्यांच्या समस्या वेळेत मार्गी लागत नसल्याच्या तक्रारी आहेत. कार्यालयीन कामकाज पारदर्शक असावे आणि नागरिकांना सुलभ व वेळेत सेवा मिळावी," असे गजानन राजे यांनी म्हटले आहे.

**निष्पक्ष चौकशीची मागणी**

खासगी व्यक्ती कार्यालयातील टेबलवर बसून कथित वसुली करीत असल्याच्या आरोपांसह हक्क नोंद प्रकरणातील विलंब, नागरिकांच्या तक्रारी आणि कार्यालयीन कामकाजाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी राजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीची तपासणी करून आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, तसेच नागरिकांची प्रलंबित कामे तातडीने निकाली काढावीत, अशीही मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, खासगी व्यक्तीमार्फत वसुली केल्याचे तसेच कार्यालयीन टेबलवर खासगी व्यक्ती बसत असल्याचे आरोप अद्याप संबंधित विभागाकडून अधिकृतरीत्या सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे या आरोपांची वस्तुनिष्ठ चौकशी होऊन सत्य परिस्थिती समोर येणे आवश्यक आहे.

# संमिश्र वातावरणामुळे तेल्हारा तालुका हैराण

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**तेल्हारा :** यावर्षी वातावरणात कमालीचा चढ उतार बघायला मिळाला आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला जरी पेरणीयोग्य पाऊस आला तरी नंतरच्या काळात पावसाने लपंडाव खेळुन शेतकऱ्यांची पिके धोक्यात आणली. भर पावसाळ्यात प्रचंड उकाडा तेल्हारा परिसरात अनुभवायला आला. जनता अक्षरशः पंखे आणि कुलरकडे वळले. सद्यस्थितीत तेल्हारा तालुक्यात समिश्र वातावरण निर्माण झाले आहे. तसं तर दरवर्षी ऋतुमानाप्रमाणे हा बदल होतच असतो परंतु यावर्षीचे चित्र काही वेगळेच बघायला मिळत आहे.शेतकरी शेतमजूरांना उकाड्यामुळे शेतात काम करणे कठीण होऊन बसले आहे त्यांना दुपारी झाडाच्या सावलीचा सहारा घ्यावा लागत आहे तर गाव वस्तीतील लोकांना कुलर पंखे लावावे लागत आहेत. याउलट रात्र झाली की हेच कुलर पंखे नकोसे होऊन मध्यरात्री नंतर चादर कींवा ब्लँकेंटचा सहारा घ्यावा लागत आहे. यामुळे शरीरातील तापमानात चढउतार होऊन याचा थेट तब्येतीवर परिणाम दिसून येत आहे. अनेकांना सर्दी ताप खोकल्याने ग्रासले असून त्यांना आपल्या उपचारासाठी खिशाला कात्री लावावी लागत आहे.अशावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष देऊन आपली यंत्रणा कामाला लावणे गरजेचे झाले आहे.खेड्यापाड्यातील जनतेपर्यंत पोहचुन त्यांचा उपचार करुन लोकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करणे अत्यावश्यक झाले आहे.

"सद्यस्थितीत वातावरणातील बदलामुळे व्हायरल आजारांची लागण होत आहे आणि इंन्फेक्शन होऊन एकमेकांमध्ये प्रसार होत आहे. त्यामुळे जनतेने खबरदारी घ्यावी सर्दी असताना एकमेकांच्या वस्तू हाताळू नये आणि इतर लोकांमध्ये मिसळतांना रुमाल वापरावा.
**डॉ. अनंत भा. वैराळे,** तेल्हारा

# स्वत:चे अस्तित्व सुरांच्या माध्यमातून जगासमोर आणणारे संगीतकार!

संगीत म्हणजे भावनांचा सागर. त्या सागरात आयुष्यभर चिंब भिजत स्वतःचं अस्तित्व सुरांच्या माध्यमातून जगासमोर आणणारे संगीतकार म्हणजे प्रभाकर पंडित. ३० सप्टेंबर १९३३ रोजी साताऱ्यात त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच संगीताची गोडी लागलेली. शालेय शिक्षण मॅट्रिकपर्यंत पूर्ण होत असतानाच गायनाचा शास्त्रीय पाया त्यांनी मटंगेबुवा आणि पेंढारकरबुवा यांच्या मार्गदर्शनाखाली रचला. पुढे व्हायोलिनसारख्या सुरेल वाद्याचे शिक्षण जे. वाय. पंडित यांच्याकडून घेतले. हीच साधना त्यांना थेट मुंबईकडे घेऊन आली आणि पुढचं आयुष्य त्यांनी संगीतासाठी समर्पित केलं. मुंबईत आल्यानंतर त्यांनी दादर येथे 'मधुवंती व्हायोलिन विद्यालय' सुरू केले. तब्बल ३० वर्षे त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना संगीताचे संस्कार दिले. संगीत हे केवळ उपजीविकेचे साधन नाही, तर जीवनाचा श्वास आहे, हे त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना शिकवले. त्याचबरोबर ते १५ वर्षे मुंबई आकाशवाणी केंद्राशी जोडलेले राहिले. विद्यापीठाच्या सुगम संगीत विषयाचे ते व्याख्याते व परीक्षक म्हणूनही कार्यरत होते. त्यांच्या कारकिर्दीचा विस्तार अत्यंत मोठा होता. सुमारे पंचेचाळीस वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी १० चित्रपटांसाठी, २० नाटकांसाठी, तसेच अनेक संगीतिका, ध्वनिफिती आणि

प्रभाकर पंडित आज जयंती




जाहिरातींच्या जिंगल्ससाठी संगीत दिले. त्यांच्या गाण्यांच्या ध्वनिफितींनी घराघरांत संगीताची गोडी निर्माण केली. यातीलच एक ध्वनिफीती अजित कडकडे यांच्या आवाजातील 'देवाचिये द्वारी'. या ध्वनिफितीला मिळालेला डबल प्लॅटिनम डिस्क हा दुर्मिळ मान त्यांच्या संगीतप्रेमी जीवनाला मुकुटमणी ठरला.

प्रभाकर पंडितांनी सुमारे ७८ गायकांना आपल्या ध्वनिफितींमधून आवाज दिला. लता मंगेशकरांसारख्या दिग्गज गायकांपासून स्वप्नील बांदोडकरांसारख्या नव्या पिढीतील कलाकारांपर्यंत त्यांनी सगळ्यांना आपल्या सुरेल रचनांमध्ये सामावून घेतले. भावगीते, भक्तिगीते, लोकगीते, अभंग, आरत्या, संतरचना, बालगीते – असा कोणताही प्रकार त्यांच्यापासून दूर राहिला नाही. त्यांच्या 'रंग ओलेत्या फुलांचे', 'मन हा मोगरा', 'अभंग प्रभात', 'वृंदावनी वेणु', 'छंद हा विठ्ठलाचा', 'भक्तिप्रकाश', 'झुकझुक गाडी', 'देव दयानिधी' अशा ध्वनिफिती आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. ही गाणी ऐकताना सुरेल प्रवाहात आपण हरवून जातो आणि प्रभाकर पंडितांची आठवण आपोआप येते. संगीत रचनांव्यतिरिक्त त्यांनी लेखनक्षेत्रातही आपली छाप सोडली. 'सुगम संगीताचे सौंदर्य' हे त्यांचे पुस्तक आजही रसिक आणि विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरते. २८ डिसेंबर २००६ रोजी प्रभाकर पंडित या सुरेल व्यक्तिमत्त्वाने देह ठेवला, पण त्यांच्या रचना, त्यांचे सूर आजही जिवंत आहेत. त्यांची गाणी ऐकताना ते आपल्या आजूबाजूला आहेत असे वाटते.

# मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात अकोटमध्ये युवक काँग्रेसचे निदर्शने

वि. प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोट :** महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने अकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात निदर्शने करण्यात आली.

आंदोलनात काँग्रेस पक्ष, युवक काँग्रेस, विद्यार्थी काँग्रेस तसेच विविध आघाड्या व सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी निवडणूक प्रक्रियेत कथित अनियमितता व 'व्होट चोरी'च्या आरोपांच्या संदर्भात केंद्र सरकार आणि संबंधित




निवडणूक यंत्रणेच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. त्यामुळे परिसर काही काळ घोषणांनी दणाणून गेला.

आंदोलनानंतर अकोटचे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात कथित 'व्होट चोरी' प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी तसेच संबंधितांना पदावरून दूर करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी लोकशाही, संविधान आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

हे आंदोलन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश महासचिव तथा अकोट विधानसभा मतदारसंघाचे पक्षनेते ॲड. महेश गणगणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी प्रदेश सचिव प्रशांत पाचडे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच जिल्हा उपाध्यक्ष सारंग मालानी, गजानन डाफे, काँग्रेस नेते मुकुंद पांडे,बादल अहिर, विकास देशमुख, अजहर शेख, शेख ख्वाजा, परवेज खान, अचल बेलसरे यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अकोला जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष मिलिंद नितोने यांच्या नेतृत्वात हे आंदोलन पार पडल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# बँकेत 6 लाखांचा बोजा असतानाच शेतजमिनीची गुपचूप विक्री

## झरि बाजार परिसरात खळबळ

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**हिवरखेड :** सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखेचे 6 लाख रुपयांचे कर्ज थकित असताना आणि सातबारा उताऱ्यावर बँकेचा बोजा स्पष्टपणे दिसत असतानाही संबंधित शेतजमिनीची परस्पर विक्री करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

सदर जमीन गट क्रमांक 2/अ असून, तिच्या इतर अधिकार सदरात फेरफार क्र. 1310 व 1311 अन्वये सेंट्रल बँकेचा बोजा नोंद आहे. असे असतानाही संबंधित व्यक्तीने स्थानिक व्यक्तीशी संगनमत करून जमिनीचा व्यवहार केल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे या व्यवहाराबाबत खरेदी-विक्री विभाग आणि संबंधित तलाठी कार्यालयाकडे विचारणा केली असता, "या प्रकरणाची आम्हाला कोणतीही कल्पना नाही" अशी हात झटकणारी उत्तरे मिळत आहेत. ज्या तलाठ्याकडे या गावाचा कार्यभार आहे, ते देखील यावर बोलण्यास तयार नाहीत.

या संदर्भात सेंट्रल बँकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले, "बँकेचा बोजा सातबाऱ्यावर असताना जमिनीची विक्री-खरेदी करणे हा गंभीर गुन्हा आहे. हा प्रकार आमच्या निदर्शनास आला आहे. यापुढे असे प्रकार करणाऱ्यांवर आम्ही कायदेशीर कारवाई करू."

तज्ज्ञांच्या मते, बँकेचा बोजा असलेली जमीन विकायची असेल तर आधी बँकेचे ना-हरकत प्रमाणपत्र (एन, ओ सी ) घेणे बंधनकारक असते आणि तलाठ्याने फेरफार तपासूनच व्यवहाराची नोंद करायची असते. मग हा व्यवहार झाला कसा? यात महसूल विभागातील कोणाचा वरदहस्त आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. या प्रकरणाची जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांनी गंभीर दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे

# पथविक्रेत्यांनी शासन योजनांचा लाभ घ्यावा : मुख्याधिकारी बाबर

वि. प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोट :** अकोट नगर परिषदेच्या वतीने शहरातील पथविक्रेत्यांसाठी लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी पथविक्रेत्यांना पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत कर्ज सुविधा, क्रेडिट कार्ड, घरकुल योजना, एकल महिला सर्वेक्षण तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

पथविक्रेत्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ऑनलाइन अर्ज सादर करावेत व शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन




मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी केले. शहर अभियान व्यवस्थापक सुनीता तायडे यांनी विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत प्रथम, द्वितीय व तृतीय कर्जासाठी नवीन पथविक्रेत्यांची नोंदणी करण्यात आली.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सीआरपी अश्विनी माकोडे, वर्षा तेलगोटे, सपना कांबळे, अर्चना आवंडकर, करूणा तेलगोटे, वर्षा घाटोळ, शुभांगी काळे, दिपाली कांबळे व जयश्री सोनटक्के यांनी सहकार्य केले. आभार प्रदर्शन निलेश देशमुख यांनी केले.

# तेल्हारा आगारातुन अकोल्यासाठी विनाथांबा बस

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील जनतेसाठी तेल्हारा आगाराने अकोला जाण्यासाठी विना थांबा बस सुरू केली आहे ही बस सकाळी ८ वाजल्यापासून जवळपास दर दोन तासांनी सुटणार आणि अकोल्यावरुन येणार आहे.

> "तेल्हारा आगारातून अकोला जाण्यासाठी विना थांबा बस सुरू करुन देण्यात आली आहे.यामुळे वेळेची बचत होऊन प्रवाशांना नियोजीत वेळेत अकोला पोहचता येईल."
>
> **निलेश मोकळकार,**
> आगार व्यवस्थापक तेल्हारा

तेल्हारा तालुक्यातील जनतेला अकोला या जिल्हाच्या ठिकाणी जाण्यायेण्यासाठी बससाठी खुप कसरत करावी लागत होती.तेल्हारा येथुन अकोला जायला मधेच येणाऱ्या थांब्यांमुळे भरपूर वेळ लागत होता.सहाजिकच जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय कामांसाठी त्या त्या कार्यालयात वेळेवर पोहचणे गरजेचे असते त्यामुळे अकोला तेल्हारा बसमध्ये अकोला तेल्हारा दरम्यान अनेक थांब्यांवरील प्रवासी घेत घेत बस अकोला येथे उशिरा पोहचत होती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तेल्हारा तालुक्यातील जनतेला मधेच चढणाऱ्या प्रवाशांचा त्रास पण होत होता त्यामुळे तेल्हार्यातुन बसणार्या प्रवाशांना आरामदायी प्रवास करणे कठीण होऊन जायचे.

# विद्यार्थ्यांच्या हातात प्रतिबंधित गुटखा; भावी पिढीचे भवितव्य धोक्यात

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**अकोट :** ज्या वयात विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तक आणि पेन असायला हवे, त्याच वयात त्यांच्या हातात प्रतिबंधित गुटख्याची पाकिटे दिसत असतील, तर यापेक्षा गंभीर बाब कोणती? अकोट शहरात प्रतिबंधित गुटख्याच्या उपलब्धतेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, तरुणाई व्यसनाच्या विळख्यात अडकण्याची भीती निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि भवितव्य धोक्यात येत असताना संबंधित यंत्रणा नेमक्या काय करीत आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.

महाराष्ट्रात गुटख्याच्या विक्रीवर बंदी असतानाही तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतो तरी कसा? अन्न व औषध प्रशासन, पोलीस विभाग, शिक्षण विभाग आणि स्थानिक प्रशासन अशा अनेक यंत्रणा कार्यरत असतानाही प्रतिबंधित गुटख्याच्या विक्रीला आळा का बसत नाही? केवळ बैठका, आदेश आणि जनजागृती मोहिमांमुळे विद्यार्थ्यांचे व्यसनापासून संरक्षण होणार आहे का?शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीला बंदी आहे. मात्र, या नियमांची अकोट शहरात प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत होते? शैक्षणिक परिसरातील पानटपऱ्या आणि गुटखा विक्रेत्यांची नियमित तपासणी होते का? नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर किती कारवाया झाल्या, याचा हिशेब संबंधित प्रशासनाने जनतेसमोर मांडण्याची गरज आहे. प्रतिबंधित गुटख्याचा पुरवठा करणाऱ्यांपासून किरकोळ विक्रेत्यांपर्यंत संपूर्ण साखळीची चौकशी होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्याची जबाबदारी केवळ पालक आणि शिक्षकांची नसून संबंधित प्रशासकीय यंत्रणांचीही आहे.

# बेलखेड येथील अपघातात दोघे जखमी

हिवरखेड : तेल्हारा मार्गावरील बेलखेड येथे आज दुपारी दोन मोटरसायकल मध्ये भीषण अपघात झाला. ज्यामध्ये दोन प्रवासी गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी रुग्णांना तात्काळ तेल्हारा ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले.सदर अपघाताची माहिती रुग्णांच्या नातेवाईकांना देण्यात आली एक रुग्ण हिंगणी येथील असल्याचे समजते, तर दुसऱ्या रुग्णाची माहिती अजून मिळाली नाही सदर प्रकरण हिवरखेड पोलिस स्टेशन मध्ये आल्यानंतर सविस्तर माहिती देण्यात येईल सदर अपघात या मार्गावर स्पीड ब्रेकर नसल्याचे समजते त्यामुळे अपघात झाल्याचे काही सांगत आहेत.

# मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**हिवरखेड :** दमानी नेत्र रुग्णालय अकोला, राजीव मालीवाल परिवार आणि रोटरी क्लब अकोला तर्फे आदर्श शिक्षक स्व. भरतराव इंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे संयोजक दमानी नेत्र रुग्णालयाचे डायरेक्टर सभापती शुक्ल, डॉ. मनीष हर्षे आणि रोटरी क्लब अकोलाचे अध्यक्ष गिरीश धाबलीया हे होते, तर शिबिराच्या अध्यक्षस्थानी अनिल भोपळे होते.

शिबिराची प्रथम सुरुवात स्व. भरतराव इंगळे व सत्यसाई बाबा




यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. नेत्रतज्ज्ञ डॉ. सौरभ इंगोले यांनी एकूण 215 रुग्णांची नेत्र तपासणी केली. त्यापैकी 76 रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले असून त्यांच्यावर दमानी रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला श्रीमती नलिनीताई इंगळे, नगरसेवक आझमखान सुभेदार खान, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष अशोक दारोकार, महेंद्र भोपळे, अकोला अर्बन बँकेचे मॅनेजर प्रशांत शेगोकार, बुलढाणा अर्बन बँकेचे मॅनेजर रामदास भालेराव, पोलीस पाटील प्रकाश गावंडे, नगरसेवक रामेश्वर हागे, सुभाष इंगळे, इंजि. सुशील इंगळे, सुरेश गिर्हे, प्रकाश खोब्रागडे, मोईजभाई जमादार, सौ. संजीवनी इंगळे, पुरुषोत्तम राजनकार, मोहम्मद राजिकभाई गोर्धा, डॉ. एम. बी. अग्रवाल, डॉ. बाजारे, डॉ. तारापूरे, दमानी हॉस्पिटलचे अजय देशमुख, राजूभाई खान, संतोष शर्मा, रवी मानकर उपस्थित होते. अकोला सत्यसाई संघटनेचे निलेश सरोदे यांनी मोफत औषधी वाटप केले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी राजेंद्र लोखंडे, वैभव गोतरकर, प्रवीण वानखडे, हरी शिंदपुरे, श्रीकृष्ण पंचबुधे, संजय ओंकारे, रफिक सौदागर, अभय इंगळे, गोपाल शूद्रे, सनी कुहडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन श्रीकृष्ण भड यांनी, तर प्रास्ताविक डॉ. प्रशांत इंगळे यांनी केले आणि आभार प्रदर्शन ऋषिकेश नळकांडे यांनी मानले.

## मिशन महाग्रामला 2029 पर्यंत मुदतवाढ

**अकोला :** ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा सक्षम करून गावांचा शाश्वत व सर्वांगीण विकास साधण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान' अर्थात मिशन महाग्रामला २०२९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मंत्रिपरिषदेने या निर्णयाला मान्यता दिली. अभियानांतर्गत निवडलेल्या प्रत्येक गावातील विकासकामांसाठी १० लाख रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निधीतून रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास तसेच विविध शासकीय योजनांचा स्थानिक पातळीवर लाभ देण्यासह गावांच्या विकासाला चालना दिली जाणार आहे.

# न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये १९८७ च्या माजी विद्यार्थ्यांची सदिच्छा भेट

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** न्यू इंग्लिश हायस्कूल, अकोला येथे २९ सप्टेंबर रोजी १९८७ च्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांनी शाळेला सदिच्छा भेट दिली. शतक महोत्सवी वर्षांमध्ये या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. प्राचार्य माधव मुनशी यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी माजी विद्यार्थी सुनील हुशे आणि दिनेश पैठणकर यांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेने दिलेले संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन



आणि शालेय जीवनातील अविस्मरणीय क्षण यांविषयी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

शाळेविषयीची कृतज्ञता व्यक्त करताना त्यांनी शाळेसोबत असलेले आपले ऋणानुबंध आणि जिव्हाळा आपल्या प्रतिक्रियांमधून व्यक्त केला. अनेक वर्षांनंतर शाळेला भेट देताना जुन्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून आला.

शाळा ही केवळ ज्ञान देणारी संस्था नसून, आयुष्यभर जपल्या जाणाऱ्या आठवणींचे आणि संस्कारांचे माहेरघर असते, याची प्रचिती या भेटीतून आली. प्राचार्य माधव मुनशी, शिक्षक याप्रसंगी उपस्थित होते.

# कुरुममध्ये सामाजिक सलोखा जपत गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात



प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील कुरुम येथे सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि उत्साहपूर्ण वातावरणात गणेश विसर्जन मिरवणूक पार पडली. गावातील आठ गणेश मंडळांनी शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुकीत सहभाग घेत गणरायाला भावपूर्ण निरोप दिला.

संत केशवभारती महाराज मंदिर गणेश मंडळाच्या मानाच्या गणपतीचे सर्वप्रथम विसर्जन मिरवणुकीत आगमन झाले. त्यानंतर बालाजी मंडळ, संत सावता माळी मंडळ, जय हनुमान मंडळ, नेताजी मंडळ, गोरक्षण मंडळ, जय भवानी मंडळ आणि जय संताजी मंडळ सहभागी झाले. पारंपरिक उत्साहात निघालेल्या मिरवणुकीत गणेशभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीत सहभागी गणेशभक्तांसाठी केशवभारती मित्र मंडळाच्या वतीने चहा व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. माजी सरपंच पुरुषोत्तम राठी व सहकाऱ्यांनी या उपक्रमासाठी सहकार्य केले. सामाजिक बांधिलकी जपत करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी माना पोलिस ठाण्याचे ठाणेदार गणेश नावकार, उपनिरीक्षक जोगदंड व पोलिस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. त्यांच्या सहकार्याबद्दल गणेशभक्तांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी भागवतकार गजेंद्र महाराज, नायब तहसीलदार महेश नागोलकर, ठाणेदार गणेश नावकार, मंडळ अधिकारी वाघमारे, राहुल राठी, अतुल वाठ, संतोष शिरभाते आदींचा नेताजी गणेश मंडळाच्या वतीने अध्यक्ष बाबुभाऊ देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

बाबूभाऊ देशमुख यांनी सामाजिक एकोपा एकता या विषयावर प्रतिक्रिया व्यक्त केली

# शासकीय अध्यापक महाविद्यालयात 'माहिती अधिकार दिन' उत्साहात साजरा




प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** शासकीय अध्यापक महाविद्यालयात 28 सप्टेंबर रोजी IQAC विभागाद्वारे बी.एड. द्वितीय वर्षाच्या सत्र-३, विद्यार्थ्यांसाठी 'माहिती अधिकार दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. आशु भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाला मुख्य वक्ते म्हणून डॉ. विशाल इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणून सहायक प्राध्यापक डॉ. निलिमा शेरेकर यांनी जबाबदारी सांभाळली.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन झाले. राधिका घाटोळ व ईश्वरी ठाकरे यांनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोमल बर्डे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय मृदुला रेखाते यांनी करून दिला.

डॉ. विशाल इंगळे यांनी माहिती अधिकाराचे महत्त्व, त्याचे नागरिकांच्या जीवनातील स्थान आणि कायद्याची विविध कलमे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. आशु भावसार यांनी भावी शिक्षकांनी माहिती अधिकाराचा वापर समाजाच्या जनजागृतीसाठी कसा करावा यावर प्रकाश टाकला. तसेच ओम वानखडे व दिपाली वाघमारे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पियुष रेळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार स्वाती बैस यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर, डॉ. शुभांगी परळीकर, डॉ. सीमा मुळे, प्रा. वैष्णवी आसरे, प्रतीक गुळभेले यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, ग्रंथपाल आणि बी.एड. द्वितीय वर्षाचे प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** राज्यातील २६५ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांसाठी या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता ऑनलाइन आवेदनपत्रे भरून घेण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सर्व विभागीय मंडळांना दिल्या आहेत. २५ सप्टेंबर रोजीच्या शासन निर्णयानुसार दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना विविध सवलती देण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे.

## शिक्षक मतदारसंघ निवडणूकीची सुचना प्रसिध्द

**अकोला :** महाराष्ट्र विधान परिषदेसाठी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून एका सदस्याची निवडणूक घ्यावयाची आहे. यासंबंधीची घोषणा भारत निवडणूक आयोगाने नुकतीच केली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ, अमरावती यांनी निवडणुकीची सूचना मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केली आहे.

## निधन वार्ता

**सुलोचना मिश्रा**



**अकोला :** येथील निवारा कॉलनीतील रहिवासी श्रीमती सुलोचना बाबाप्रसाद मिश्रा यांचे 29 रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.


# बार्शिटाकळी नगरपंचायत

बार्शिटाकळी जि. अकोला.
दुरध्वनी क्र. ०७२५५-२५२८२५

दिनांक- २८/०९/२०२६

**- प्रेस नोट -**

बार्शिटाकळी शहरातील सर्व नागरिकांना याद्वारे सुचीत करण्यात येते की, नगर पंचायत कडून दिनांक-१६,१७ व १८ सप्टेंबर २०२६ रोजी अतिक्रमण निर्मुलन मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र गणेशोत्सव व इतर काही तांत्रिक कारणास्तव सदर मोहीम काही काल स्थगीत करण्यात आली होती. मात्र आता पोलिस प्रशासन तसेच इतरही प्रशासकीय विभागाकडून सहकार्य मिळणार असल्याने स्थगीत केलेले ही अतिक्रमण मोहीम दिनांक - २९,३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वा. पासून मोहीम समाप्त होईपर्यंत राबविण्यात येणार आहे. सदरची मोहीमेत जुने न्यायालय ते खडकपुरा चौक, खडकपुरा चौक ते खोलेश्वर मंदीर रोड तसेच आठवडी बाजार व शहरातील इतर मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात येणार आहे.

यासबंधी अतिक्रमण धारकांना अगोदरच कळविण्यात आले होते. त्यांना याद्वारे पुन्हा कळविण्यात येत आहे. तरी सर्व शहर वासीयांनी याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी,**
बार्शिटाकळी नगरपंचायत

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## जुलैपासून मानधन थांबले; स्वयंपाकींना उपासमारीची वेळ

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**यवतमाळ** : प्रधानमंत्री पोषण आहार योजनेतून मध्यान्ह भोजन योजना राबविली जाते. या कामाची जबाबदारी स्वयंपाक्यांवर अवलंबून आहे. मात्र या स्वयंपाकी महिलांना जुलै महिन्यांपासून मानधनच मिळाले नाही. यामुळे या कुटुंबांवर उपासमारीची पाळी ओढावली आहे. राज्यातील शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये 'प्रधानमंत्री पोषण आहार योजनेअंतर्गत' हजारो विद्यार्थ्यांना दुपारचे जेवन दिले जाते. या कामाची जबाबदारी स्वयंपाक्यांवर अवलंबून असते. अत्यंत तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे मानधन गेल्या जुलै महिन्यापासून रखडले असून, सणासुदीच्या दिवसांतही त्यांच्या पदरी केवळ निराशाच आली आहे. शाळांमध्ये पोषण आहार शिजवण्याचे काम दिवसभर चालत असल्यामुळे या स्वयंपाकींना इतर कोणताही जोडधंदा किंवा मजुरी करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचे संपूर्ण कुटुंब या योजनेतून मिळणाऱ्या अत्यल्प पैशांवरच अवलंबून असते. असे असताना त्यांना जुलैपासूनचे मानधन अद्याप मिळालेले नाही. यामुळे स्वयंपाकींच्या कुटुंबियांवर संकट ओढवले आहे.

# वंचितांच्या विकासातून दीनदयाल यांच्या विचारांची वाटचाल - डॉ. मोहन भागवत

### शेतकरी, महिलांच्या स्वावलंबनाच्या प्रयोगांचे कौतुक; यवतमाळात जयंती समारोह

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**यवतमाळ** : समाजातील वंचित आणि पीडित घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केवळ विचार मांडणे पुरेसे नसून, तो प्रत्यक्ष कृतीत उतरविणे आवश्यक आहे. दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शेतकरी, महिला आणि वंचित घटकांनी स्वावलंबनाचे जे प्रयोग उभे केले आहेत, ते दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांची कृतीशील वाटचाल दर्शवितात, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त दीनदयाल सेवा प्रतिष्ठानतर्फे दारव्हा मार्गावरील चिंतामणी कृषी उत्पन्न बाजार परिसरात आयोजित समारोहात ते बोलत होते. प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, माजी मंत्री मदन येरावार, संस्थाध्यक्ष नरहर देव, उपाध्यक्ष ज्योती चव्हाण व डॉ. मनोज पांडे, सचिव विजय कद्रे उपस्थित होते.

दहा वर्षांपूर्वी संस्थेच्या कामाची पाहणी केली होती. त्यानंतरच्या काळात संस्थेने विविध उपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय काम उभे केले आहे. शेतकऱ्यांनी विषमुक्त शेतीचे प्रयोग यशस्वी केले, तर आत्महत्याग्रस्त शेतकरी महिलांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारला. या प्रयत्नांचा विस्तार देशभर होऊ शकतो, असे भागवत यांनी नमूद केले.

दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनातील साधेपणा आणि सेवाभावाचा उल्लेख करताना भागवत यांनी अंत्योदय व एकात्म मानवदर्शनाच्या विचारांची मांडणी केली. स्वतःसाठी जगण्यापेक्षा इतरांच्या जीवनात सुख निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे, हाच भारतीय संस्कृतीचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थाध्यक्ष नरहर देव यांनी प्रतिष्ठानच्या तीन दशकांच्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी 'ध्यासपंथ' स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास खासदार संजय देशमुख, आमदार बाबूसिंग महाराज, किसन वानखडे, राजू तोडसाम, श्याम खोडे, माजी मंत्री हंसराज अहीर, संदीप धुर्वे, नीलय नाईक, उत्तम इंगळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालन गजानन परसोडकर यांनी केले. आभार मनीष गंजीवाले यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वडार समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी महसूलमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**उमरखेड** : वडार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेच्या वतीने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात निवेदन देण्यात आले. यावेळी समाजाच्या विविध प्रश्नांवर मंत्र्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

वडार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाशी संबंधित दगड, मुरूम व गौण खनिज व्यवसायातील अडचणी दूर करणे, रॉयल्टीमध्ये सवलत देणे, भूमिहीन कुटुंबांना जमीन व घरकुल उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व शैक्षणिक सुविधा निर्माण करणे, समाजभवन उभारणे यासह समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक विविध मागण्या निवेदनातून मांडण्यात आल्या. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी समाजाच्या दीर्घकाळापासून प्रलंबित प्रश्नांची माहिती महसूलमंत्र्यांना दिली. मागण्यांची सकारात्मक दखल घेत "आगामी मंत्रिमंडळ बैठकीत संबंधित विषय मांडून ते तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू," असे आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. मंत्र्यांच्या या भूमिकेमुळे वडार समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना शासनस्तरावर गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी संघटनेचे विभागीय जिल्हाध्यक्ष पवन मेंढे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रश्न मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा सुरूच ठेवणार

■ "महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वडार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांची सकारात्मक दखल घेतली आहे. आगामी मंत्रिमंडळ बैठकीत हे विषय मांडून ते मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो. समाजाच्या मागण्यांना केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न ठेवता त्या प्रत्यक्षात मार्गी लागेपर्यंत 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचा पाठपुरावा सुरूच राहील."
- पवन मेंढे, विभागीय जिल्हाध्यक्ष, मी वडार महाराष्ट्राचा संघटना, यवतमाळ

## शेतात गांजाची लागवड; ३.६४ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**यवतमाळ** : करंजी येथील एका शेतकऱ्याने आपल्या शेतात तुरी, पराटीच्या (कापूस) पिकात बेकायदेशीरपणे गांजाच्या झाडांची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

पांढरकवडा पोलिसांनी छापा टाकून सुमारे १६० गांजाची झाडे जप्त केली आहेत. या कारवाईत एकूण ३ लाख ६४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पांढरकवडा पोलिस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला (DB Team) माहिती मिळाली की, धरण पोड करंजी येथील शालिक बापूराव मेश्राम याने आपल्या करंजी शेत शिवारातील गट क्र. ९५ मधील शेतात अंमली पदार्थ असलेल्या गांजा वनस्पतीच्या झाडांची अवैध लागवड केली आहे.

या माहितीची खातरजमा करून, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या परवानगीने पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत सदर शेतावर छापा टाकला. शेताची पाहणी केली असता, तुरी आणि पराटीच्या उभ्या पिकांमध्ये मधोमध गांजाची लागवड केल्याचे आढळून आले. पोलिसांनी तेथून एकूण १६० गांजाची झाडे जप्त केली.

या जप्त केलेल्या झाडांचे पाने, फुले, बिया, देठ, शेंडे आणि फांद्या यासह वजन केले असता ते एकूण १५.१३२ किलोग्रॅम भरले. यात प्रामुख्याने गांजा वनस्पतीच्या पाने, फुले, देठ आणि बिया यांचे निव्वळ वजन ७.०९४ किलोग्रॅम असून, त्याचे बाजार मूल्य सुमारे ३,५४,७०० रुपये इतके आहे. तसेच, जप्त करण्यात आलेल्या झाडांचे खोड आणि मुळ यांचे एकूण वजन ८.७४४ किलोग्रॅम असून, त्याची किंमत १०,००० रुपये आहे. पोलिसांनी या कारवाईत एकूण ३ लाख ६४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल मोक्यावरून जप्त केला आहे.

याप्रकरणी आरोपी शालिक बापूराव मेश्राम (वय ५५ वर्ष, रा. धरण पोड करंजी) याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट (NDPS Act) कलम ८(b) आणि २०(a) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई यवतमाळचे पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, तसेच सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी (पांढरकवडा) रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पांढरकवडा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन सुशीर, सचिन रघुपती, सहाय्यक फौजदार प्रमोद जुनुनकर, पोलिस हवालदार विलास जाधव, नाईक पोलिस शिपाई सुनील राठोड, सचिन काकडे, पोलिस शिपाई राजू मुत्यालवार, होमगार्ड रोशन सोमशेट्टीवार, राकेश कात्रजवार, दिनेश सातपुते यांच्या पथकाने ही कारवाई केली.

या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक सागर पेंढारकर करत आहेत. करंजी परिसरात झालेली ही मोठी कारवाई असून, अवैध अंमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## 'बंजारा भवन'साठी दोन एकर जागा देण्याची महसूलमंत्र्यांची ग्वाही

### नगरसेविका ज्योत्सना रुडे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**उमरखेड** : स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उमरखेड येथे भव्य 'बंजारा भवन' उभारण्यासाठी २ एकर शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी नगरसेविका ज्योत्सना प्रतिक रुडे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. उमरखेड दौऱ्यावर आले असताना २८ सप्टेंबर रोजी रुडे यांनी त्यांना निवेदन दिले. यावेळी महसूलमंत्र्यांनी 'बंजारा भवन'साठी जागा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिल्याने बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांनी राज्याच्या विकासात, विशेषतः कृषी व ग्रामीण महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. उमरखेड परिसराचा त्यांच्या विचारांशी तसेच बंजारा समाजाच्या समृद्ध ऐतिहासिक परंपरेशी जवळचा संबंध असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. बंजारा समाजाची कला, लोकसंस्कृती, पारंपरिक पोशाख, भाषा आणि जीवनशैली हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैविध्याचा महत्त्वाचा भाग आहे. हा वारसा जतन करून तो नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी उमरखेड येथे 'बंजारा भवन' उभारण्याचा संकल्प समाजाच्या वतीने करण्यात आला आहे. या भवनात सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक सण-उत्सव, विवाह सोहळे, मेळावे व बैठकींसाठी सभागृह, बंजारा समाजाचा इतिहास व संस्कृती जतन करण्यासाठी संग्रहालय, तसेच ग्रंथालय, डिजिटल अभ्यासिका आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उभारण्याचा मानस आहे.

या सर्वसमावेशक प्रकल्पासाठी उमरखेड शहर किंवा तालुका परिसरातील २६ ई-क्लास शासकीय जमिनीतून दोन एकर जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नगरसेविका रुडे यांनी केली. सकारात्मक निर्णय झाल्यास बंजारा समाजाची संस्कृती जतन होण्यासोबतच स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मृतींनाही योग्य न्याय मिळेल, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. महसूलमंत्र्यांनी जागा देण्याची ग्वाही दिल्याने समाजबांधवांकडून समाधान व्यक्त होत आहे.

## जागतिक रेबीज दिनानिमित्त जनजागृती शिबिर

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**बाभूळगाव** : जागतिक रेबीज दिनानिमित्त पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुचिकित्सालय, बाभूळगाव येथे २८ सप्टेंबर रोजी रेबीज लसीकरण व जनजागृती शिबिर घेण्यात आले. यावेळी पशुपालक, शेतकरी व सुशिक्षित बेरोजगारांना रेबीज आजार, त्यापासून बचाव तसेच पाळीव प्राण्यांच्या लसीकरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कुत्रे व मांजरींना वेळेवर रेबीज प्रतिबंधक लस देणे आवश्यक असून, पशुपालकांनी लसीकरणाचे वेळापत्रक पाळावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच पाळीव व इतर जनावरांची योग्य निगा राखण्याबाबतही माहिती देण्यात आली.

शिबिरात ६९ श्वान व ३ मांजरी अशा एकूण ७२ प्राण्यांचे रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. डॉ. सुरेखा नामवाड व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संघर्ष राठोड यांनी पशुपालकांना रेबीज प्रतिबंध, लसीकरणाचे महत्त्व आणि घ्यावयाच्या काळजीबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी डॉ. सुरेखा नामवाड, डॉ. संघर्ष राठोड, हेमंत नेवल, डॉ. राहुल भटकर, डॉ. सचिन पाटील, पंकज मस्के, योगेश पाटील, जाकीर खान, ब्रह्मानंद इंगोले, धर्मचंदजी गुगलीया, अतुलभाऊ जगताप, नितीन गावंडे, रोहित गारघाटे, मयूर पिसे, सूरज श्रृंगारे, रुपेश आडे, दशाली तातेड यांच्यासह बहुसंख्य पशुपालक उपस्थित होते.

## दुष्काळ जाहीर, आता शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**कळंब** : शासनाने यवतमाळ जिल्ह्यासह राज्यातील अनेक तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. या निर्णयाचे स्वागत करतानाच केवळ दुष्काळ जाहीर करून प्रश्न सुटणार नाही. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कळंब तालुका शाखेने केली आहे.

> ■ दुष्काळी अनुदान तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे, पिकविम्याची रक्कम तत्काळ मंजूर करावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करून टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवावी, तसेच अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान तातडीने द्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या.

या मागणीसाठी दिलीपराव इंगोले यांच्या नेतृत्वात पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री यांच्या नावे तहसीलदार कळंब यांना निवेदन दिले. यंदा पावसाअभावी पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यातच कर्जबाजारीपणा, बोगस बियाणे, पिकविम्याची रक्कम न मिळणे तसेच चारा व पाणीटंचाईमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



यावेळी राष्ट्रवादी युवती काँग्रेस महाराष्ट्र राज्य ग्रामीणच्या कार्याध्यक्ष मनिषाताई काटे (भोसले), यवतमाळ जिल्हा सरचिटणीस सुधाकरराव निरवाडे, युवक अध्यक्ष ओंकार चव्हाण, विजय पाटे, सिद्धार्थ गोटे, अरुण पठाण, लक्ष्मण किन्हेकर, गोपाल केवटे, संजय देवतळे, ऋषी गणेशकर, मनोहर शेंडे, गोदावरी भोयर, सुमन ढाले, योगेश कुटे, चेतन येरेम, पिंटू वायकर, अमोल मलाकापूरे आदी उपस्थित होते.

# गोदावरी अर्बनचा ५,५६१ कोटींचा व्यवसाय

### ७ टक्के लाभांश जाहीर; १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**यवतमाळ** : गोदावरी अर्बन पतसंस्थेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नांदेड येथील ब्लेसिंग सभागृहात उत्साहात पार पडली. संस्थेने मागील आर्थिक वर्षात ५ हजार ५६१ कोटी रुपयांचा एकूण व्यवसाय केला असून, २९ कोटी ३२ लाख रुपयांचा निव्वळ नफा नोंदविला. या पार्श्वभूमीवर सभासद व ग्राहकांसाठी ७ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

सभेला माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे, संस्थापक अध्यक्ष आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, अध्यक्षा राजश्री पाटील, उपाध्यक्षा हेमलता देसले, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव ॲड. रवींद्र रगटे यांच्यासह संचालक, अधिकारी, कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

अध्यक्षा राजश्री पाटील यांनी संस्थेने आर्थिक शिस्त व ग्राहकाभिमुख सेवांना प्राधान्य दिल्याने सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे सांगितले. "गोदावरी अर्बन ही केवळ पतसंस्था नसून समृद्ध परिवार, पुरोगामी विचार आणि लाखो सभासदांचा दृढ विश्वास आहे," असे त्यांनी नमूद केले. माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी गोदावरी अर्बनचा पारदर्शक कारभार व आर्थिक सुदृढता इतर पतसंस्थांसाठी मार्गदर्शक ठरेल, असे सांगितले. आमदार बालाजी कल्याणकर यांनी संस्थेच्या विस्तारामागे व्यवस्थापकीय नियोजन महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. संस्थेच्या ठेवी ३ हजार ७९ कोटी, तर कर्ज वितरण २ हजार ४८१ कोटी रुपये झाल्याची माहिती त्यांनी दिली.

सभेच्या निमित्ताने उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी, कर्मचारी व शाखांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यवतमाळ शाखा क्रमांक एकने ४४७ कोटी रुपयांच्या ठेवींसह सर्वोच्च ठेवींच्या गटात कामगिरी नोंदविली. यवतमाळ शाखा क्रमांक दोन, पुसद, मुख्य शाखा, वणी, नागपूर आदी शाखांचाही गौरव करण्यात आला. उत्कृष्ट वसुलीसाठी यवतमाळ शाखा क्रमांक एकचा विशेष सन्मान करण्यात आला. "५ हजार ५६१ कोटींचा व्यवसाय ही संपूर्ण गोदावरी अर्बन परिवाराच्या एकजुटीची फलश्रुती आहे," असे तांबेकर यांनी सांगितले.

## राजेश आडे यांच्या राजकीय प्रवेशाने चर्चेला उधाण; सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जनसंपर्क

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**आर्णी** : शासन सेवेत कामगार अधिकारी ते कामगार उपआयुक्त म्हणून जबाबदारी पार पाडल्यानंतर यावर्षी सेवानिवृत्त झालेले माजी आयुक्त राजेश आडे यांनी सामाजिक कार्याच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात प्रवेश केला आहे. त्यांच्या या प्रवेशामुळे आर्णी तालुक्यातील राजकीय वातावरणात चर्चेला उधाण आले आहे.

शासकीय सेवेत असतानाही सामाजिक कार्याची आवड जोपासत त्यांनी व्यसनमुक्तीसाठी विविध जनजागृती उपक्रम राबविल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगण्यात येते. गणपती संस्थानच्या माध्यमातून दरवर्षी खेडबिड ते माहूर पायी दिंडीचे आयोजन करून ते वारकऱ्यांसोबत सहभागी होत असल्याचेही सांगण्यात आले. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी सामाजिक उपक्रमांवर भर दिला आहे. जवळा, लोणी आणि मसोडा या गावांमध्ये नागरिकांसाठी स्वखर्चाने आरओ पाणी शुद्धीकरण यंत्रणा बसवून दिल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी दोन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्याचे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. सामान्य नागरिकांच्या सुख-दुःखाच्या प्रसंगी मदतीला धावून जाण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही सांगण्यात येते. या सामाजिक उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर आडे यांच्या राजकीय प्रवेशाकडे स्थानिक पातळीवर लक्ष लागले आहे. दरम्यान, त्यांच्या राजकीय प्रवेशामुळे विरोधकांकडून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप आडे समर्थकांकडून करण्यात आला आहे. विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्याने बदनामीचे राजकारण केले जात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. मात्र, या आरोपांवर संबंधित विरोधकांची भूमिका समोर आलेली नाही.

## अर्चितभैया जाजोदिया भाजप युवा मोर्चात सहभागी

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

अमरावती:प्रसिद्ध समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभाई जाजोदिया यांचे सुपुत्र अर्चितभैया जाजोदिया हे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जयंतीनिमित्त आणि त्यांच्या सार्वजनिक जीवनाची २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, अमरावती शहर जिल्हा भाजप युवा मोर्चाने आयोजित केलेल्या 'वडनगर ते वाराणसी' सेवा संकल्प अभियानादरम्यान भाजपमध्ये सामील झाले. भाजप अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमाला भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज दादा महाडिक, भाजप विदर्भ संयोजक प्रा. दिनेश सूर्यवंशी, गुजरातच्या द्वारका येथील खासदार जितेंद्रभाई खंजरिया आणि युवा मोर्चा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष विजय उर्फ विकी शर्मा यांच्यासह भाजप आणि युवा मोर्चाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# 49 प्रलंबित आश्वासनांवर विधानसभा आश्वासन समितीची सुनावणी!

## आ. रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक, राज्यातील जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रत्यक्ष निर्णय

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती:** अमरावती टेक्स्टाईल पार्क व आयटी उद्योगाला गती, बंद उद्योगांच्या पुनरुज्जीवनाचे धोरण; दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रतन इंडिया पॉवरच्या पाणीपुरवठ्याचा पाणी वापर बंद करून दुष्काळा पार्श्वभूमीवर जल साठा राखीव ठेवा. रतन इंडिया, रेमंड कंपनीकडून जागा वापस घेण्याचा बैठकीत निर्णय घेऊन आ. राणा यांनी बैठकीत आदेश केले.

आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या ४९ आश्वासनांचा आढावा घेतला. औद्योगिक जमिनींचे प्रकल्पनिहाय ऑडिट करण्याची मागणी; 'किती जमीन–किती गुंतवणूक–किती रोजगार' हा निकष निश्चित करण्यावर भर देण्यात आला. बैठकीस समितीचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्यासह राजेश पवार, समीर मेघे, अनुप अग्रवाल, विनोद अग्रवाल, विक्रम पाचपुते, सचिन कल्याण शेट्टी, पराग शाह, रमेश कराड, किशोर पाटील, अमोल पाटील, प्रदीप जायस्वाल, किरण सामंत, हिरामण खोसकर, जयंत बंनसोडे, दौलत दारोडा, वरुण सरदेसाई, अमित झनक आणि राजू खरे आदी समिती सदस्य, आमदार उपस्थित होते. समितीसमोर प्रलंबित आश्वासनांची सद्यस्थिती, आतापर्यंत झालेली कार्यवाही, विलंबाची कारणे, प्रलंबित बाबी आणि पुढील कार्यवाहीची कालमर्यादा याबाबत संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून थेट माहिति घेण्यात आली. केवळ कागदोपत्री पूर्तता न दाखवता प्रत्यक्षात आश्वासनांची किती अंमलबजावणी झाली आहे, याची वस्तुस्थिती तपासण्यावर समितीने भर दिला. बैठकीस उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, कामगार विभागाच्या अपर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, दीपेंद्र सिंग कुशवा, विधानसभा आश्वासन समितीचे सहसचिव नागनाथ



थिटे, अवर सचिव अनिल राणे, महसूल विभागाचे उपसचिव भगवान सावंत, उद्योग विभागाचे उपसचिव अक्षय कनके, उपसचिव अजित सासुलकर, कामगार विभागाचे दीपक पोकळे, महावितरणचे संतोष सोंगाळे, महसूल विभागाचे सहसचिव श्रीराम यादव, कामगार विभागाचे उपसचिव स्वप्निल साहेब, मुख्य अभियंता प्रकाश चव्हाण, वर्षा ठाकूर/घुगे, किरण जाधव, मनोज गोदाड, राजेंद्र पवार, रविंद्र हजारे, संतोष भिसे, सुनील सूर्यवंशी, सूर्यकांत निकम, धनंजय सावळकर, बी. टी. मरावंते, पंकज नागदेवते, राजश्री तांबे, मुम्धा बने, समीर देऊलकर, अभिजीत कांबळे, आदिनाथ पोपळघट, संजय ढोळे, भागवत ढाकले, अंकुर हरी डावडे, त्रुजंग खंदारे, मनिष वाठ, मंगेश कोहार, प्रविण परदेशी, रो. दि. कदम पाटील, भूषण कुलकर्णी, वैभव थोरात, ज्ञानदा निलेकर, भूषण हर्षे, सचिन राक्षे, नितीन पेवेकर, अविनाश पगारे, प्रफुल्ल पिपळकर, पंकल तगलपल्लेवार, गणेश कठाळे, डॉ. राजेंद्र शेळके, एस. ए. खोब्रागडे, नितीन काळे, रविराज काळभोर, उद्धव दहिपाळे, राम चौधरी, प्रदीप भीन्टाडे आणि प्रविण फोकमार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### औद्योगिक जमिनींचे प्रकल्पनिहाय ऑडिट

उद्योग उभारणी आणि रोजगारनिर्मितीसाठी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर जमीन उपलब्ध करून दिली जाते. मात्र काही प्रकल्पांमध्ये अनेक वर्षे उलटूनही अपेक्षित प्रकल्प पूर्ण झालेले नाहीत किंवा उपलब्ध करून दिलेल्या संपूर्ण जमिनीचा वापर झालेला नाही. त्यामुळे अमरावती, वाशिमसह राज्यातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये गेल्या १० ते १५ वर्षांत वाटप अथवा अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीचे प्रकल्पनिहाय ऑडिट करण्याची मागणी करण्यात आली.

### गृहनिर्माण विभागाच्या १४ आश्वासनांवर कार्यवाही

उद्याच्या बैठकीत गृहनिर्माण विभागाशी संबंधित १४ प्रलंबित आश्वासनांचा आढावा घेण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अतिरिक्त २ हजार घरांची उपलब्धता निर्माण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी यावेळी मांडण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी उपलब्ध शासकीय जमीन, गृहनिर्माण योजना आणि संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधण्याबाबतही चर्चा होणार आहे.

# आजपासून 'खादी महोत्सवा'ला सुरुवात

## नागरिकांनी भेट देण्याचे आवाहन

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती:** राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने बुधवार, दि. 30 सप्टेंबर ते शनिवार, दि. 3 ऑक्टोबर दरम्यान भव्य खादी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव बस स्थानकासमोरील सायन्सकोर मैदानावरील 'मेळघाट हाट' येथे आयोजित केला जात आहे.आदिवासी आणि ग्रामीण भागातील महिलांनी सौर चरख्यावर स्वतः सूत कातून व शिवणकाम करून तयार केलेली दर्जेदार खादी व सौर खादी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. या महोत्सवात सर्व खादी उत्पादने ग्राहकांना सवलतीच्या दरात मिळतील. खादी कापड, विविध प्रकारची खादी वस्त्रे आणि इतर हस्तकलेवर आधारित वस्तूंचे स्टॉल्स या ठिकाणी लावण्यात येणार आहेत. ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांच्या हाताला रोजगार मिळवून देण्यासाठी आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी या खादी महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदिप चेचरे यांनी केले आहे.

## गणेश विसर्जन मिरवणुकीमुळे वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती :** शहरातील न्यू आझाद गणेश मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर 1 ऑक्टोबर 2026 रोजी दुपारी 3 ते रात्री 10 या वेळेत वाहतूक वळवण्यात आली असून प्रमुख मार्गांवर 'नो-एन्ट्री' लागू करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी 28 सप्टेंबर रोजी हे आदेश जारी केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायदा १९८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे आदेशात म्हटले आहे.या आदेशानुसार गर्ल्स हायस्कूल चौकाकडून इर्विन चौकाकडे जाणारी वाहने पोलीस पेट्रोल पंपमार्गे बस स्टँडकडे, तर बाबा कॉर्नरकडून येणारी वाहतूक लेखुमल चौकाकडे वळवण्यात येणार आहे. रेल्वे स्टेशन चौकाकडून येणारी वाहतूक मिरवणूक मालवीय चौक पार करेपर्यंत पूर्णपणे बंद राहणार आहे. गद्रे चौकाकडून येणारी वाहतूक उड्डाणपूल, राजापेठ किंवा गांधी चौकामार्गे, तर हमालपुराकडून येणारी वाहतूक रेल्वे स्टेशन चौक व मर्क्युरी टी पॉइंटमार्गे वळवण्यात येणार आहे. राजकमल चौकाकडून ये-जा करणारी वाहतूक सरोज चौक व चित्रा चौकामार्गे धावेल.

नागरिकांची गैरसोय

# 1 ऑक्टोबर रोजी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस' साजरा करा

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे 1 ऑक्टोबर रोजी संपूर्ण राज्यभरात 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस' साजरा करण्यात येणार आहे. त्यानुसार सर्व शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांनी यानिमित्ताने विविध उपक्रम आयोजित करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



ज्येष्ठ नागरिक दिवसानिमित्त कार्यालय व स्थानिक पातळीवर सार्वजनिक पदयात्रा, प्रभात फेऱ्या, सभा, परिसंवाद आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. समाजकार्यात विशेष योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा आणि ज्येष्ठांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा विशेष सत्कार व गौरव करण्यात यावा. ज्येष्ठ नागरिकांचे हक्क, त्यांच्यासाठीच्या शासकीय योजना, वैद्यकीय सोयी-सुविधा आणि मदतीसाठी असलेल्या हेल्पलाइनबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. ज्येष्ठ नागरिकांना वृद्धापकाळात सुसह्य जीवन जगता यावे, त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे आणि त्यांना राज्य शासनाच्या सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरणाचा पूर्ण लाभ मिळावा, या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशा सूचना देण्यात आल्या आहे.

# पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ उत्साहात

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७मधील नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, उपप्राचार्य श्री. नितेश चौधरी, शिक्षण विभाग प्रमुख श्री. गजानन अढाऊ तसेच अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अर्चना त्रिपाठी विद्यार्थी, पालक व महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होतेकार्यक्रमाची सुरुवात "हीच आमची प्रार्थना' या प्रार्थनेने करण्यात आली.



कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक श्री. निलेश राठोड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना स्मार्ट ध्येय कसे निश्चित करावे व ते साध्य करण्यासाठी प्रभावी नियोजन कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक व वैयक्तिक आयुष्यात स्पष्ट ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिल ठाकरे यांनी नवप्रविष्ट विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. नितेश चौधरी यांनी माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडत त्यांच्या करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. तसेच शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. गजानन आढाऊ यांनी चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. यावेळी विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाचे महत्त्व, महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रम तसेच कृषी क्षेत्रातील भविष्यातील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कळसकर यांनी केले तर आभार प्रा. श्वेता देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, अंतिम वर्षातील विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.दीक्षारंभ कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ध्येयनिश्चिती, आत्मविश्वास आणि कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याची प्रेरणा निर्माण झाली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## अंजनगाव बारी येथील वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्रासाठी अकोल्याचा पर्याय

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती :** प्रादेशिक परिवहन कार्यालय , अमरावती यांच्या अधिनस्त अंजनगाव बारी (बडनेरा) येथील वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र तसेच अत्याधुनिक व संगणकीकृत चाचणी पथकाचे काम सध्या अपूर्ण असल्याने वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) नूतनीकरणाचे काम सद्यास्थितीत पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. सर्व वाहनधारकांनी नजीकच्या अकोला जिल्ह्यात किंवा इतर जिल्ह्यात जाऊन आपल्या वाहनांची तपासणी व नूतनीकरण करून घ्यावे, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी रे दिली आहे.



ज्या वाहनधारकांनी अद्याप आपल्या वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण केलेले नाही किंवा ज्यांच्या प्रमाणपत्राची मुदत येणाऱ्या काळात संपत आहे, अशा सर्व वाहनधारकांनी पूर्वपरवानगी घेऊन आणि ऑनलाईन तारीख आरक्षित करून अकोला किंवा नजीकच्या इतर जिल्ह्यात जाऊन आपल्या वाहनांची तपासणी व नूतनीकरण करून घ्यावे. नागरिकांनी होणारी गैरसोय टाळण्यासाठी या सुविधेचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# स्वच्छता व प्लास्टिकमुक्त परिसरासाठी तपासणी मोहीम

## पाच दुकानदारांवर दंडात्मक कारवाई; ४ हजार रुपयांचा दंड वसूल

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शहरातील स्वच्छता. तसेच प्लास्टिकमुक्त परिसरासाठी जनजागृती व तपासणी मोहीम राबविण्यात आली. अंबादेवी मार्केट व गांधी चौक परिसरात राबविण्यात आलेल्या या मोहिमेदरम्यान प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, विक्री व साठवणूक तसेच परिसरातील स्वच्छतेची पाहणी करण्यात आली




.महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त (१) भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, स्वास्थ्य अधीक्षक विजय बुरे तसेच सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर (झोन क्र. २) यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. तपासणीदरम्यान दुकानदारांकडे ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करण्यासाठी दोन डस्टबिन उपलब्ध आहेत का, तसेच त्यांचा प्रत्यक्ष वापर केला जात आहे का, याची पाहणी करण्यात आली. डस्टबिनचा वापर न केल्याप्रकरणी पाच दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

गुप्ताजी यांच्यावर ₹५००, योगेश स्टोअर्स यांच्यावर ₹१,०००, पूजा बांग्लस यांच्यावर ₹५००, रोशन गुप्ता (दूध डेअरी) यांच्यावर ₹१,०००, तर संजय इंगोले यांच्यावर ₹१,००० असा दंड आकारण्यात आला. या कारवाईत एकूण ₹४,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ्य निरीक्षक मिथुन उसरे, धनिराम कलोसे, सचिन सैनी व मिथुन वाघमारे यांच्यासह महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. महानगरपालिकेच्या वतीने नागरिक व व्यावसायिकांनी परिसर स्वच्छ ठेवावा, ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करावा तसेच प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळावा, असे आवाहन करण्यात आले.

# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूकीची सुचना प्रसिध्द

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती :** महाराष्ट्र विधान परिषदेसाठी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून एका सदस्याची निवडणूक घ्यावयाची आहे. यासंबंधीची घोषणा भारत निवडणूक आयोगाने नुकतीच केली असून त्यानुसार विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ यांनी निवडणुकीची सूचना प्रसिद्ध केली आहे. निवडणूकीसाठीची नामनिर्देशनपत्रे उमेदवाराला किंवा त्याच्या कोणत्याही प्रस्तावकाला, निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे मंगळवार दिनांक ६ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात सभागृह क्र. २ तळमजला, विभागीय आयुक्त कार्यालय, कॅम्प, अमरावती येथे दाखल करता येतील. नामनिर्देशनपत्रे वर उल्लेख केलेल्या ठिकाणी व वेळी मिळू शकतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी बुधवार दि. ७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून निवडणूक निर्णय अधिकारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयातील सभाकक्ष क्र. २ तळमजला, विभागीय आयुक्त कार्यालय, कॅम्प अमरावती येथे करण्यात येईल. उमेदवारी मागे घेण्याबद्दलची सूचना उमेदवाराला किंवा उमेदवाराने लेखी प्राधिकार दिलेल्या त्याच्या कोणत्याही प्रस्तावकाला किंवा निवडणूक प्रतिनिधीला वरील परिच्छेद (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यालयात शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोबर, २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत देता येईल. निवडणूक लढविली गेल्यास शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान घेण्यात येईल. असे या सुचनेव्दारे घोषित करण्यात आले आहे.




# वसुलीची हद्द, ऑडीओतून सिध्द, सरपंच मागतो खुद्द!

***दिड लाखाचे काम, म्हणे ४० हजार द्या दाम *नाव सरपंचाचे देवाचे; करतो कथित कारनामे दैत्याचे**

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

शाळेतील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आलेल्या निधीतून ४० हजार रुपयांची कथित मागणी केल्याची ऑडिओ क्लिप समोर आली आहे सरपंच यांचे नाव नावात देव परंतु कारणाने मात्र काळे, परिसरात बोलल्या जात आहे, या मागणीसंदर्भातील कथित ऑडिओ क्लिप सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती आली असून, 'द्या दाम, नाहीतर बंद करा काम...' अशा आशयाचे संभाषण असल्याचा समोर आले आहे.

या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्रामस्थांकडून चौकशीची मागणी होत आहे. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आलेल्या निधीतूनच ४० हजार रुपयांची कथित मागणी होत असेल, तर इतर विकासकामांतून किती रक्कम मागितली असेल, आणि गिळली असेल, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

संबंधित कामाच्या रकमेतील हिस्सा देण्यासंदर्भात संभाषण झाल्याचा क्लिप समोर आली आहे. तसेच पाच टक्के हिस्सा पुरेसा नसल्याचे आणि त्यापेक्षा अधिक रक्कम मागितल्याचे कथित संभाषण ऑडिओ क्लिपमध्ये आहे. त्यामुळे या प्रकरणाची प्रशासनाने चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. गावातील रस्ते, नाली, पाणीपुरवठा आणि इतर विकासकामांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. आतापर्यंत झालेल्या सर्व विकासकामांची मंजुरी, अंदाजपत्रक, मोजमाप, प्रत्यक्ष काम आणि देयकांची तपासणी करून निधीचा हिशोब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तर भ्रष्टाचारी सरपंच असा नाम उल्लेख येथील गावकरी करत आहेत गावाच्या विकासासाठी हे पद असते मात्र या पदाचा फायदा चक्क टाळ वरील लोणी खाण्यासाठी जर केला जात असेल तर या सरपंच करायचं तरी काय असाच प्रश्न गावकरी उपस्थित करत आहेत जर सरपंच शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी आलेल्या निधीतूनच ४० हजार रुपये मागत असेल तर इतर कामातून किती उपमा मागत असून मागितली असतील व आतापर्यंत भ्रष्टाचार करून किती गिळले असतील हा सर्व हिशोब जनतेसमोर आणावा व या सरपंच विरोधात कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरत आहे, गावातील रस्ते देखील धातुर्मा दूर करून बड्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात त्यातून मलिदा घडला व थातूरमातून काम करून पैसे मिळण्याचा आरोप देखील नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, घरकुलाच्या लाभासाठी लाभार्थ्यांकडून २०-२० हजार रुपये घेतल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत असल्याची चर्चा आहे. यासाठी गावातीलच कंत्राटी दलालाला ठेवण्यात आल्याचा आरोपही केला जात आहे. या आरोपांचीही स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. ४० हजार रुपयांची कथित मागणी, विकासकामांतील कथित गैरव्यवहार आणि घरकुलाबाबतच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.


शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

कसे होईल विकासाचे काम, सरपंच मागतो ४० हजारांचे दाम!

कथित पैशांच्या मागणीची ऑडिओ क्लिप सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती

सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

भ्रष्टाचार हमेशा, टक्केवारीचा 'श्रीगणेशा'!

*सरपंच म्हणतो, 'द्या दाम, नाहीतर बंद करा काम' * ४० हजार रुपयांची कथित मागणी; तर इतर कामांतून किती असतील 'गिळले'

लाच मागणी व कथित भ्रष्टाचाराविरोधात गावकरी एसीबीकडे करणार तक्रार

लाच मागणीचा आरोप, भ्रष्टाचाराच्या तक्रारींचा पाढा; आता एसीबीच्या चौकशीकडे गावकऱ्यांच्या नजरा

## सरपंचाची यारी भारी ; घरकुलातून २०-२० हजारांसाठी दलाल चेतनची वसुली भारी



दरम्यान, घरकुलाच्या लाभासाठी लाभार्थ्यांकडून २०-२० हजार रुपये घेतल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत असल्याची चर्चा आहे. सरपंचाने यासाठी गावातीलच कंत्राटी दलालाला ठेवण्यात आल्याचा आरोपही केला जात आहे. याचेही पुरावे व लाभार्थी समोर येत आहेत ज्यांच्याकडून २०-२० हजार रुपये घेतले ते देखील लवकरच समोर येऊन यांच्या विरोधात बंड फुकणे येईल असे सांगण्यात आले आहे, तर गावातील घरकुल पात्र अपात्र व किती रुपये खाल्ले याची देखील चौकशी होऊन ही देखील यादी समोर लवकरच येणार आहे. या आरोपांचीही स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची निवड, मंजूर रक्कम, हप्त्यांचा तपशील आणि प्रत्यक्ष लाभ यांची प्रशासनाने तपासणी करावी. २०-२० हजारांच्या कथित वसुलीची सत्यता अधिकृत चौकशीतून समोर आणावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## थोडक्यात

### विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालयात आरोग्य शिबिराचे आयोजन



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय कारंजा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी (कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा) मधील विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजनमहाविद्यालयाच्या हॉलमध्ये करण्यात आले.दिनांक २२/०९/२०२६ , २३/०९/२०२६ आणि २६/०९/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची '४ॐ' मानकांनुसार सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली.या तपासणी दरम्यान किरकोळ आजार आढळलेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ औषधोपचार देण्यात आले.

तसेच अधिक उपचाराची गरज असलेल्या (संदर्भित) विद्यार्थ्यांना कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयात पुढील उपचारासाठी बोलाविण्यात आले आहे.एकूण ३४० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.यात ११ विद्यार्थ्यांना किरकोळ आजारांवर औषधोपचार दिले गेले, तर १४ विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले.हे आरोग्य शिबिर विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम.पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ज्युनिअर पर्यवेक्षक प्रा.ललित खरड, डॉ.विनय लोढा,प्रा. लाहोटी,प्रा. कोथळकर,प्रा. इंगोले,प्रा.वैजंत रा.पाटील, प्रा.प्रिया चौधरी आणि प्रा. पिंपळकर यांनी मोलाचे योगदान दिले.या शिबिरादरम्यान महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदाचे सहकार्य लाभले.

### किन्हीराजा आश्रमशाळेत स्वच्छता मोहिमेतून स्वच्छतेचा संदेश



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सेवा संकल्प अभियानांतर्गत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, किन्हीराजा, ता. मालेगाव येथे स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच शाळा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

**सेवा संकल्प अभियानांतर्गत विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांचा सहभाग**

या स्वच्छता मोहिमेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी शाळा परिसरातील स्वच्छता केली तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. या उपक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा सरपंच सुरेश ठाकरे यांची उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. स्वच्छ परिसर, निरोगी जीवन आणि पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## मंगरुळपीरमध्ये संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर धरणांची पाहणी

### मोतसावंगा प्रकल्पात ३८ टक्के पाणीसाठा; नगर परिषदेकडून पाणी बचतीचे आवाहन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपीर शहरातील आगामी संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नगर परिषद प्रशासनाने पाणीटंचाई निवारण उपाययोजनांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. याच अनुषंगाने दि. २९ मे २०२६ रोजी भाजपा गटनेते गणेशभाऊ खोडे, शिक्षण सभापती वीरेंद्रसिंह ठाकूर, पाणीपुरवठा सभापती सुधीर घोडचर आणि माजी नगरसेवक सचिन पवार यांनी नगर परिषदेचे प्रभारी पाणीपुरवठा अभियंता पराग नवरे व कनिष्ठ लिपिक अ. जाकीर यांच्यासोबत मोतसावंगा लघु प्रकल्प, जोगलदरी लघु प्रकल्प तसेच इचोरी-जुनोना प्रकल्पाची पाहणी केली.

मंगरुळपीर शहराला मोतसावंगा लघु प्रकल्पातून गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणीपुरवठा केला जातो. सद्यस्थितीत या प्रकल्पात सुमारे ३८ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याने आगामी काळात शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली.




पाहणीदरम्यान धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा, प्रकल्पांची सद्यस्थिती तसेच भविष्यातील पाणी वितरणाचे नियोजन यांचा आढावा घेण्यात आला. उन्हाळ्यात शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये, यासाठी आतापासूनच आवश्यक नियोजन व उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



दरम्यान, संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करून पाणी बचतीस सहकार्य करावे, असे आवाहन मंगरुळपीर नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

## सेवा संकल्प अभियानातून मालेगाव - डोंगरगाव व रामगाव येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान'ंतर्गत कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना राबविण्यात येतात. या योजनांचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृषी विकास अधिकारी अभिजित देवगिरीकर यांनी जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती स्तरावर विशेष शिबिरांचे नियोजन केले आहे.



**मालेगावात विविध घटकांची माहिती**

पंचायत समिती मालेगाव येथे आयोजित मार्गदर्शन सभेत कृषी विस्तार अधिकारी संजय पडोळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना योजनेंतर्गत मिळणाऱ्या विविध लाभांची माहिती दिली. यामध्ये नवीन विहीर, विहीर दुरुस्ती, सोलार पंप, इलेक्ट्रिक मोटर पंप, ठिबक सिंचन संच, तुषार सिंचन संच आणि पाईपलाईन या घटकांचा समावेश आहे. सहायक गटविकास अधिकारी रमेश कंकाळ व सहायक प्रशासन अधिकारी सोंडकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तालुक्यातील बहुसंख्य गावांमधील शेतकऱ्यांनी सभेला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

## निवडणूक आयोगावरील आरोपांना ठोस पुरावे नाहीत; आ. श्याम खोडे यांची टीका

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



**घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास टिकवणे आवश्यक; मंगरूळपीर येथे पत्रकार परिषद**

काँग्रेस नेते राहुल गांधी हे निवडणूक आयोगावर वारंवार आरोप करून देशातील घटनात्मक संस्थांविषयी जनतेच्या मनात अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. निवडणूक आयोगावर आरोप करताना आजपर्यंत ठोस पुरावे सादर करण्यात आलेले नाहीत, अशी टीका आमदार श्याम खोडे यांनी मंगरूळपीर येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

मंगळवारी, दि. २९ सप्टेंबर रोजी आयोजित या पत्रकार परिषदेला आमदार श्याम खोडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, भाजपाचे माजी जिल्हा अध्यक्ष सुरेश लुंगे,अनिल गावंडे, विरेंद्रसिंग ठाकूर आणि अभिषेक दंडे उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना आमदार श्याम खोडे म्हणाले की, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून निवडणुकीतील कथित अनियमिततेच्या मुद्द्यावरून काँग्रेसकडून देशभरात आंदोलने केली जात आहेत. मात्र, या आरोपांच्या समर्थनार्थ कोणतेही ठोस पुरावे समोर आलेले नाहीत. भारतीय जनता पक्षाला निवडणूक आयोगाकडून मदत केली जाते, असा आरोप काँग्रेसकडून केला जातो. परंतु, काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर अशाच प्रकारे प्रश्न उपस्थित केले जातात का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.भारतीय संविधान हा देशाचा कणा असून, संविधान आणि घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास अबाधित राखणे आवश्यक आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या महत्त्वावर भर दिला होता. त्यांच्या विचारांचा संदर्भ देत घटनात्मक संस्थांचा सन्मान आणि त्यांच्यावरील विश्वास टिकवून ठेवण्याची गरज असल्याचे खोडे यांनी स्पष्ट केले.सत्ता असतानाही निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर अशाच प्रकारे प्रश्न उपस्थित केले जातात का, याचा जनतेने विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. निवडणूक प्रक्रियेबाबत वस्तुस्थिती जाणून घेऊन सत्य जनतेपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी माध्यमांनी पार पाडावी, असेही ते म्हणाले.निवडणूक आयोगावरील आरोप, घटनात्मक संस्थांची भूमिका आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता या विषयांवर आपली भूमिका मांडण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

## दुष्काळग्रस्तांसाठी लोकप्रतिनिधींचे वर्षभराचे वेतन- भत्ते स्थगित करा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी व पशुधनासमोर पाणी आणि चाऱ्याचे संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारणासाठी निधीची कमतरता भासू नये, यासाठी मंत्री, खासदार, आमदार तसेच माजी लोकप्रतिनिधींचे व सहकार क्षेत्रातील पदाधिकारी यांचे एक वर्षाचे वेतन व भत्ते स्थगित करून ती रक्कम दुष्काळ निवारणासाठी वळवावी, अशी मागणी मालेगाव पंचायत समितीचे माजी सदस्य सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे-पाटील यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**जमा होणाऱ्या रकमेचा दुष्काळ निवारणासाठी वापर करण्याची सुभाष देवढे पाटील यांची मागणी**


शनिवार दि. ५ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

नको आकांक्षीत आणि मागासल्याचे कारण, राबवा जलसंधारणाचे धोरण!

* दुष्काळ मुळे होणार नाही शेतकऱ्याचे मरण * दुष्काळ कायमचा हद्दपार करण्यासाठी जलसंधारण कामांना गती द्या

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

पाझर तलाव, सिंचन तलाव, छोटे-मोठे धरणे व बंधाऱ्यांची दुरुस्ती, नदी - नाले खोलीकरण करून वाढवा पाणी साठवण क्षमता नैसर्गिक जल स्तोत्रांना जिवंत करा सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील जनतेवर दुष्काळाचे गंभीर संकट असून शेतकऱ्यांना मदत करण्याबरोबरच जनावरे वाचविण्यासाठी चारा व पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. या संकटाच्या काळात लोकप्रतिनिधींनीही आपली सामाजिक बांधिलकी जपणे गरजेचे आहे.

सद्गुरू गजानन महाराज संस्थेने शासनाने मागणी न करताही मुख्यमंत्री सहाय्यता निधीत १ कोटी ११ लाख रुपये जमा केल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. मात्र, जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनीही दुष्काळग्रस्तांसाठी आर्थिक योगदान देण्याची तयारी दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



मंत्री, खासदार, आमदार तसेच माजी लोकप्रतिनिधींचे व सहकार क्षेत्रातील पदाधिकारी यांचे एक वर्षाचे वेतन व भत्ते दुष्काळ निवारणासाठी देण्यात यावेत.

त्यामुळे शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळू शकतो, असे सुभाष देवढे-पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यांनी ही मागणी गांभीर्याने विचारात घेऊन तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

## पथनाट्यातून कायद्याचा जागर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गत वर्षीप्रमाणे याहीवर्षी गणेशोत्सवाच्या उत्साहात कायद्याची जनजागृती करण्याचा उपक्रम वाशिम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने हाती घेतला होता. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या किमान समान कार्यक्रम अंतर्गत शहर व ग्रामीण भागातील एकूण ११ विविध गणेशोत्सव मंडळांसमोर पथनाट्य सादर करून पोक्सो कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि आगामी १२ डिसेंबर रोजी होणाऱ्या लोकअदालतीची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविली गेली. या पथनाट्यांना गणेश मंडळ परिसरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

तालुक्यातील काटा येथील गजानन गणेशोत्सव मंडळ व दिनांक २५ सप्टेंबर रोजी ड्रीमलँड सिटी येथील गणेशोत्सव मंडळासमोर पथनाट्य सादर करण्यात आले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री अनिल सुब्रमण्यम आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव



श्री विठ्ठल चौखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या पथनाट्यात विधी स्वयंसेवक सुशील भिमजियाणी, राजकुमार पडघाण, शाहीर उत्तम ओंकार इंगोले, मोतीराम खडसे, माधव डोंगरदिवे, प्रभू कांबळे, शीतल बन्सोड, संध्या सभादिंडे आणि माधव कोंडुजी गायकवाड यांनी भूमिका साकारल्या आहेत.

'जागर पोक्सो कायद्याचा' हे पथनाट्य उपमुख्य लोक अभिरक्षक ?ड. राजेश विसपुते यांनी लिहून दिग्दर्शित केले आहे. बालविवाह प्रतिबंध आणि लोकअदालतीवर आधारित पथनाट्य निवृत्ती सरकटे यांनी लिहून दिग्दर्शित केले आहे. विविध गणेशोत्सव मंडळांच्या परिसरात सादर होत असलेल्या या पथनाट्यांमुळे नागरिकांचे लक्ष वेधले.

# खामगावात पप्पू पॅटर्नची जोरदार चर्चा

## गणेश विसर्जन मिरवणुकीत 'पप्पू पॅटर्न डान्स' ने तोडला रेकॉर्ड

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**खामगाव :** सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असणारे श्री तानाजी व्यायाम मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते तथा प्रसिद्ध समाजसेवक प्रसाद उर्फ पप्पू तोडकर यांच्या यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीची संपूर्ण खामगाव शहरात जोरदार चर्चा रंगली आहे. विसर्जन मिरवणुकीत काढण्यात आलेली दिमागदार मिरवणूक आणि त्यानंतर पप्पू तोडकर यांनी केलेला धम्माल च्पप्पू पॅटर्न डान्सज् सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून त्यांनी व्ह्यूजचा एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. यंदाची गणेश विसर्जन मिरवणूक केवळ धार्मिक सोहळा न राहता विविध संस्कृती आणि परंपरेचा एक अद्भुत संगम ठरली.

मिरवणुकीत बौद्ध समाजाच्या वतीने लाठीकाठी व लेझिम पथक सज्ज होते, तर मातंग समाज महाकाल चौक यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज आणि अण्णा भाऊ साठे यांच्या प्रेरणादायी गीतांवर तरुणाईने ठेका धरला. तानाजी व्यायाम मंडळाचे शिवकालीन शस्त्र प्रात्यक्षिकांचे पथक, मुलींचे पारंपरिक ढोल-ताशा व लेझिम पथक यांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. या



मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची रशियातील (मॉस्को) दुर्मिळ आठवणींना उजाळा देणारी नयनरम्य देखावा (झाकी) होती. या संपूर्ण सोहळ्यात महिला व तरुण वर्गाची उपस्थिती अत्यंत उल्लेखनीय आणि वाखाणण्याजोगी होती. मिरवणुकीच्या अंतिम टप्प्यात पप्पुभाऊंनी च्दरारा दरारा... आप्पाजीचा दराराज् या लोकप्रिय गाण्यावर केलेल्या खास च्पप्पू पॅटर्न डान्सज्रे उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह भरला. या डान्सचा व्हिडीओ सोशल मीडियावर अपलोड होताच अवघ्या एका दिवसात ५० हजारांहून अधिक व्ह्यूज, हजारो लाईक्स आणि फॉलोअर्स मिळाले. खामगाव परिसरातील सोशल मीडियाच्या इतिहासातील हा एक सर्वात मोठा आणि नवा रेकॉर्ड ठरला आहे. याशिवाय, इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या व्हिडीओने तब्बल ५ लाख व्ह्यूजचा टप्पा पार केला आहे. पप्पू तोडकर यांच्या या अनोख्या आणि जोशपूर्ण डान्सची सध्या सर्वत्र चर्चा असून, खामगावात 'पप्पू पॅटर्न'ने खरोखरच सर्व जुने रेकॉर्ड मोडून काढले आहेत.

# भजनी मंडळांना साहित्य खरेदीसाठी मिळेल अनुदान

## २ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**खामगाव :** जिल्ह्यातील भजनी मंडळांना भजनी साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी २५ हजार रुपयांचे शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील भजनी मंडळांना या योजनेचा लाभ दिला जाणार असल्याची माहिती श्री राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन शासकीय समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत भजनी मंडळाचे स्वतंत्र नोंदणी प्रमाणपत्र असणे सक्तीचे नाही. ज्या मंडळात १५ ते २० महिला किंवा पुरुष सदस्य आहेत आणि मंडळाने ४० ते ५० भजनांचे कार्यक्रम केले आहेत, अशी मंडळे अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत.

या निधीतून मंडळांना टाळ, मृदंग, हार्मोनियम आदी आवश्यक भजनी साहित्य खरेदी करता येणार आहे. शासनाकडे ऑनलाइन अर्ज प्राप्त होण्याच्या क्रमाने पात्र मंडळांची निवड करण्यात येणार आहे. तरी पात्र भजनी मंडळांनी २३ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन केंद्रावर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज सादर करावा, असे आवाहन कलावंत मानधन शासकीय समिती सदस्य सुरेश गव्हाळ यांनी केले आहे.

**या साहित्यासाठी अनुदान**

शासकीय अनुदानातून भजनी मंडळांना टाळ, मृदंग, हार्मोनियम आदी आवश्यक साहित्य खरेदी करता येणार आहे. त्यामुळे मंडळांच्या साहित्याची गरज भागण्यास मदत होणार आहे..

ऑनलाइन अर्ज सादर करताना काही अडचण आल्यास सुरेश गव्हाळ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

**दोन हजार मंडळांना लाभ**

भजनी साहित्य खरेदीसाठीच्या या योजनेअंतर्गत मंडळांचा ठरावीक लक्ष्यांक निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे १,८०० ते २,००० भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या अनुदानाचा लाभमिळणार आहे.

# महाराष्ट्र बॅडमिंटन संघटनेच्या अध्यक्षपदी आ.अरुण लखाणी, उपाध्यक्षपदी विजय पळसकर

## नागपूर येथे झालेल्या निवडणुकीत बिनविरोध निवड; क्रीडा क्षेत्रातून अभिनंदन

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**मलकापूर :** महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन संघटनेच्या नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या निवडणुकीत भाजपचे आमदार अरुण लखाणी यांची अध्यक्षपदी, तर स्पोर्ट्स झोन ऑफ मलकापूरचे सचिव विजय पळसकर यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. २७ सप्टेंबर रोजी झालेल्या निवडणूक प्रक्रियेत दोन्ही पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड झाल्याची माहिती राज्य संघटनेचे सचिव सिद्धार्थ पाटील यांनी दिली. विजय पळसकर यांनी वडील स्व. भाऊराव पळसकर यांची प्रेरणा आणि क्रीडामहर्षी वसंताभाऊ सावजी यांच्या मार्गदर्शनातून क्रीडा क्षेत्रातील प्रवासाला सुरुवात केली. विद्यार्थी दशेत जलतरण व बॉलबॅडमिंटनमध्ये नैपुण्य मिळविले. पुढे स्पोर्ट्स झोन ऑफ मलकापूरच्या माध्यमातून खेळाडू घडविण्याचे कार्य सुरू ठेवले. यांनी आजवर विविध राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. त्यांना राज्य शासनाचा २०१६ चा उत्कृष्ट जिल्हा क्रीडा संघटक पुरस्कार तसेच २०२१ चा गुणवंत जिल्हा क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त आहे. या निवडीबद्दल बुलढाणा बॅडमिंटन संघटनेचे मनीष लखाणी, प्रा. कैलास पवार, खिझर ह्यात खान, प्रा. डॉ. नितीन भुजबळ यांच्यासह क्रीडाप्रेमी, प्रशिक्षक व खेळाडूंनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**बॅडमिंटन खेळ अधिक मजबूत होईल**

» बॅडमिंटन खेळासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासोबतच विजय पळसकर यांनी जिल्ह्यात बॅडमिंटन संघटनेचे जाळे मजबूत केले आहे. त्यामुळे राज्य संघटनेच्या वतीने त्यांच्यावर सोपविण्यात आलेली उपाध्यक्षपदाची जबाबदारी ते निश्चितच यशस्वीरीत्या पार पाडतील.ज्

**प्रा. डॉ. नितीन भुजबळ,** अध्यक्ष, स्पोर्ट्स झोन ऑफ मलकापूर

# मुख्यमंत्र्यांकडे फुंडकर यांनी मुंबईत सुपूर्द केला 11 लाखांचा धनादेश

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी बाजार समितीचा मदतीचा हात

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**खामगाव :** दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव पुढे सरसावली आहे. बाजार समितीच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ११ लाख रुपयांची देणगी देण्यात आली. या मदतीचा धनादेश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी मंगळवारी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांच्या मदतीसाठी सामाजिक बांधिलकी जपत बाजार समितीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी

मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन ११ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी प्रदान केला. शेतकऱ्यांच्या संकटकाळात मदतीचा हात देण्याच्या या उपक्रमाचे महत्त्व यानिमित्ताने अधोरेखित झाले. बाजार समितीच्या या योगदानामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या मदतकार्यास हातभार लागणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव च्या या योगदानाबद्दल आभार व्यक्त केले.

# खामगावमध्ये बकऱ्या, मेंढ्या चारण्यावरून हाणामारी; चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल

## शहर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रार

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**खामगाव :** एमएसईबीजवळील पडीत जागेत मेंढ्या व बकऱ्या चारण्याच्या कारणावरून दोन गटांत वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना २८ सप्टेंबर रोजी सकाळी घडली. याप्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात दोन्ही गटांकडून परस्परविरोधी तक्रारी दाखल झाल्या असून, पोलिसांनी २९ सप्टेंबर रोजी चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या प्रकरणात शेख सोहील शेख शब्बीर यांच्या फिर्यादीवरून स्वामी सोनाजी हाके (२७) व अमर सुधाकर हाके (२५), दोघेही (रा. हिवरखेड)यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, त्यांचे चुलत काका शेख सरदार शेख नजीर हे एमएसईबीजवळील पडीत जागेत बकऱ्या चारत असताना, तेथे मेंढ्या चारणाऱ्या दोघांशी वाद झाला. भांडण सोडविण्यासाठी शेख दिलदार शेख सरदार व शेख सोहील तेथे गेले असता काठीने मारहाण झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेत दोघे जखमी झाल्याचे नमूद करण्यात आले असून, वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**मेंढपाळावर हल्ला!**

याच घटनेप्रकरणी स्वामी सोनाजी हाके यांनी दिलेल्या तक्रारीवरून शेख सरदार शेख नजीर व शेख दिलदार शेख सरदार यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, मेंढ्या चारण्यावरून झालेल्या वादात शिवीगाळ करण्यात आली तसेच दगडाने डोक्यावर मारहाण केल्याचा आरोप आहे. काठीने मारहाण करून शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५१(२), ३५२ व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांचा तपास पोहेकॉ विठ्ठल चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# पूर्णा नदीच्या पात्रात बुडून भानगुरा येथील वृद्धाचा मृत्यू

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**मलकापूर:** घरून उपचारासाठी अमरावती येथे गेलेले आणि अचानक बेपत्ता झालेले भानगुरा येथील ५७ वर्षीय वृद्ध पूर्णा नदीच्या पात्रात मृत अवस्थेत आढळून आले आहेत. या प्रकरणी एमआयडीसी मलकापूर पोलीस ठाण्यात मर्ग नोंदवण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गजानन प्रल्हाद पाटील (वय ५७, रा. भानगुरा, ता. मलकापूर) यांच्या दोन्ही पायांना जखमा झाल्याने दोन-तीन दिवसांपूर्वी ते उपचारासाठी अमरावती येथे गेले होते. मात्र, उपचारादरम्यान कोणालाही काही न सांगता ते दवाखान्यातून निघून गेले होते. रविवारी (दि. २७ सप्टेंबर) नातेवाईक त्यांचा शोध घेत असताना, एक इसम धुपेश्वर जवळील पूर्णा नदीच्या पात्रात पाण्यात बुडालेल्या स्थितीत आढळल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर नातेवाइकांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथे जाऊन पाहणी केली असता, मृत व्यक्ती गजानन पाटील हेच असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी मयत गजानन पाटील यांचे चुलत जावई नीना ज्ञानदेव नप्ते पाटील (वय ४३, रा. भानगुरा) यांच्या तोंडी रिपोर्टवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला आहे. ठाणेदारांच्या मार्गदर्शनाखाली हेडकॉन्स्टेबल राजेश बावने या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# आगाशे काका माऊली (कृष्णानंद सरस्वती) यांच्या 18 व्या पुण्यस्मरण निमित्त श्रीक्षेत्र बरसाना येथे भाविकांची गर्दी

## माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी घेतले दर्शन

प्रतिनिधी ३० सप्टेंबर



**खामगाव :** परमपूज्य श्री आगाशे काका माऊली (कृ ष्णानंद सरस्वती) यांच्या आठराव्या पुण्यस्मरण निमित्त अमृतनगर भागातील श्रीक्षेत्र बरसाना येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.रविवार दि.२७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी काकडा आरती,काकांच्या समाधीवर पवमानाचा महाभिषेक व श्री गोपाल सहस्त्रनामाचे जपानुष्ठान, सकाळी ८.३० ते १०.३० पर्यंत श्रीपाद राजं शरणं प्रपद्ये,श्री श्रीपादर श्रीवल्लभ चरित्र गाथा. सकाळी ११.३० वाजता नैवेद्य आरती होवुन दुपारी १२ वाजता महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. प.पू.काकांच्या समाधी दर्शनासाठी खामगावसह बाहेरगावावरुन आलेल्या हजारो गुरु बंधु-भगिणींनी श्रीक्षेत्र बरसाना येथे गर्दी केली होती. खामगाव विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा,माजी नगराध्यक्षा सौ.अलकादेवी सानंदा, माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा यांनी बरसाना येथे जावुन काका माऊलींच्या समाधीचे पूजन करून दर्शन घेतले.यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते पंजाबरावदादा देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर अध्यक्षा तथा माजी नगराध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने,संतोष आटोळे,सुरेंद्र चव्हाण हे उपस्थित होते. प.पु.आगाशे काका यांच्या पुण्यतिथीनिमित्त हजारो भाविकांना महाप्रसादाचे वितरण सुद्धा करण्यात आले.माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीकृष्णदास काका माऊली समाधी सेवा मंडळ बरसाना यांच्या सेवकऱ्यांनी परिश्रम घेतले.

# विसर्जन मिरवणुकीत 'डीजे'चा दणदणाट; 13 जणांवर गुन्हे

## शिवाजीनगर, खामगाव शहर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**खामगाव :** गणेश विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांना परवानगी असतानाही 'डीजे'चा कर्णकर्कश आवाज करून ध्वनीमर्यादेचे उल्लंघन केल्याप्रकरणी शिवाजीनगर आणि खामगाव शहर पोलिसांनी १३ जणांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. २५ सप्टेंबर रोजी झालेल्या विसर्जन मिरवणुकीतील प्रकारांप्रकरणी २८ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. शिवाजीनगर पोलिसांनी मस्तान चौक आणि फरशी चौक परिसरातील सात प्रकरणांत कारवाई केली. संबंधित डीजे व साऊंड चालकांनी विसर्जन मिरवणुकीत वाहनांवर स्टिरिओ साऊंड बॉक्स बसवून पूर्वपरवानगीशिवाय मोठ्या आवाजात गाणी वाजविल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी अनिकेत शिंदे, रोहित गवळे, योगेश गोळे, आकाश सारवान, पवन पुरवार, किरण शेवाळे आणि दीपक तेली यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. खामगाव शहर पोलिसांनी केडिया टर्निंग परिसरातील सहा प्रकरणांत कारवाई केली. राजेश चवरे, नागेश करगळे, संदीप पाटील, अथर्व पाचपोर, आकाश चौधरी आणि नरेश पाटील यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नागेश करगळे यांच्याविरुद्ध दाखल प्रकरणात भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ सोबत महाराष्ट्र पोलिस अधिनियमाच्या कलम १३६ चाही समावेश करण्यात आला आहे.

**डीजे चालकांमध्ये धास्ती !**

शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सात, तर खामगाव शहर पोलिस ठाण्यात सहा, असे एकूण १३ स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. विसर्जन मिरवणुकीदरम्यान ध्वनीमर्यादा आणि परवानगीच्या अटींचे पालन न केल्याप्रकरणी झालेल्या या कारवाईमुळे डीजे चालकांमध्येही धास्ती निर्माण झाली आहे.

# वरखेडचे सुपुत्र सचिन तायडे यांचा मंत्र्यांच्या हस्ते उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने गौरव

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**मलकापूर :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने आयोजित च्अभियंता गौरव समारंभ-२०२६ज् अंतर्गत राज्यभरातील अभियंते व कर्मचाऱ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव सोहळा आज २९ सप्टेंबर रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे उत्साहात पार पडला. सार्वजनिक बांधकाम विभागातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल मलकापूर तालुक्यातील वरखेड येथील सुपुत्र तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१ इंजि. सचिन निवृत्ती तायडे यांना सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते च्उत्कृष्ट अभियंता पुरस्कारज् प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन २०२५-२६ या कालावधीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा या गौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला. त्यामध्ये इंजि. सचिन तायडे यांचा समावेश आहे. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव (रस्ते) शरद ना. राजभोज, सचिव (बांधकाम) आबासाहेब नागरगोजे, सचिव (म.रा.पा.सु.वि.म. मुंबई) गिरीश जोशी, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश भ. पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक राजेंद्र पा. निगोट, सचिव राष्ट्रीय महामार्ग विभाग संतोष शेलार, सचिव प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्राम सडक योजना प्रशांत औटी, अधीक्षक अभियंता सुनील थोटांगे, कार्यकारी अभियंता एकनाथ तळेले, जितेंद्र काळे, उपअभियंता प्रवीण पुंडकर आदी मान्यवर उपस्थित होते.




**लोकाभिमुख अभियंता म्हणून वेगळी ओळख**

इंजि. सचिन तायडे हे अभियांत्रिकी क्षेत्रातील तांत्रिक जबाबदारी सक्षमपणे सांभाळतानाच लोकाभिमुख अभियंता म्हणूनही परिचित आहेत. नागरिकांच्या विविध अडचणी समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्यासाठी ते तत्परतेने कार्य करतात. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या शेतरस्त्यांच्या कामांना प्राधान्य देत, योग्य नियोजन, दर्जा आणि तांत्रिक पद्धतीने कामे पूर्ण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. ग्रामीण भागातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या गरजा समजून घेणे आणि विकासकामांच्या माध्यमातून त्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांच्या कार्यशैलीची विशेष बाब मानली जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये त्यांच्या कार्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. अशा लोकाभिमुख अधिकाऱ्यांच्या कार्यामुळे केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाला गती मिळत नाही, तर सार्वजनिक बांधकाम विभागाची, अर्थातच शासनाची प्रतिमा जनमानसात अधिक उंचावण्यास मदत होते. शासनाच्या विकासकामांचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याने नागरिकांमध्ये शासनाच्या कामकाजाबद्दल सकारात्मक विश्वास व आपुलकीची भावना निर्माण होण्यासही हातभार लागतो.

उपअभियंता संवर्गातून अत्यंत कमी वयात शासनाचा हा मानाचा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या अभियंत्यांमध्ये इंजि. सचिन तायडे यांचा समावेश असल्याचे सांगण्यात येते. तांत्रिकदृष्ट्या दर्जेदार काम, नागरिकांच्या गरजा आणि ग्रामीण विकास यांचा समन्वय साधत केलेल्या कार्याची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. या गौरव सोहळ्यास महाराष्ट्रातील विविध भागांतून सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंते व कर्मचारी उपस्थित होते. इंजि. सचिन तायडे यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल अभियंता सहकारी, मित्रपरिवार, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच मलकापूर तालुक्यातील नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या पुरस्कार सोहळ्यावेळी इंजि. सचिन तायडे यांचे वडील तथा माजी सरपंच निवृत्ती तायडे, आई सौ. संगीता तायडे, पत्नी इंजि. सौ. कोमल सचिन तायडे तसेच त्यांच्या दोन्ही मुली सांचल व क्रांतीज्योती उपस्थित होत्या. शासनाच्या वतीने प्रदान करण्यात येणारा मानाचा पुरस्कार वरखेडच्या सुपुत्राला मिळाल्याने तायडे परिवारासह मलकापूर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# यंदा रब्बी कांदा लागवडीवर दुष्काळाचे सावट

## सिंचनावर निर्बंधाची शक्यता; शेतकऱ्यांना पाण्याची चिंता

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**खामगाव :** दुष्काळी परिस्थितीचा

दुष्काळा परिणाम यंदाच्या रब्बी हंगामातील कांदा लागवडीवर होण्याची शक्यता आहे. पाणीसाठ्याची स्थिती लक्षात घेता आगामी काळात सिंचनासाठी पाणी देण्यावर निर्बंध येण्याची शक्यता आहे. त्यामुळे रब्बी कांद्याचे लागवड क्षेत्र घटण्याची चिन्हे दिसून येत आहेत. कांदा लागवडीसाठी अनेक शेतकऱ्यांनी शेतजमिनीची मशागत करून तयारी सुरू केली आहे. काही ठिकाणी रोपवाटिका तयार करण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. मात्र, लागवडीनंतर पिकाला नियमित पाणी देणे आवश्यक असल्याने उपलब्ध पाण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. पाण्याची हमी नसताना कांदा लागवड करून उत्पादनाचा धोका पत्करायचा की लागवड कमी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. यंदाच्या खरीप हंगामात पावसाने ओढ दिल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झाला असून, रब्बी हंगामातील पिकांचे नियोजनही अडचणीत आले आहे पुरेसे पाणी उपलब्ध न झाल्यास कांद्यासह अन्य रब्बी पिकांच्या क्षेत्रावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. यंदा रब्बी हंगामात कांदा लागवड किती होते, याकडे शेतकऱ्यांसह कृषी विभागाचे लक्ष लागले आहे.

# सावकारांच्या जाचात शेतकरी शासकीय यंत्रणेतच संभ्रम ?



प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** अवैध सावकारीच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र सावकारी अधिनियम, २०१४ मध्ये स्पष्ट अधिकार व प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. मात्र, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अवैध सावकारांविरोधात तक्रारी करण्याचे आवाहन करणाऱ्या व्हायरल व्हिडिओमध्ये दिलेल्या त्रोटक माहितीनंतर सावकारग्रस्त शेतकऱ्यांमध्ये तक्रार महसूल विभागाकडे करायची की सहकार विभागाकडे, असा संभ्रम निर्माण झाल्याचा आरोप सावकारग्रस्त शेतकरी समितीचे अध्यक्ष अरुण इंगळे यांनी केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत नोंदीत २०१४ चा सावकारी नियमन कायदा स्वतंत्र कायदा म्हणून उपलब्ध आहे.

सावकारग्रस्त शेतकरी समितीने सातत्याने केली होती. त्यानंतर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अस्तित्वात आला. या कायद्यात निबंधक यंत्रणेला चौकशी व न्यायालयीन स्वरूपाचे काही अधिकार देण्यात आले आहेत.जालना जिल्ह्यातील मंठा येथील प्रकरणाचा दाखला देत, जिल्हा उपनिबंधकांनी जमीन मूळ मालकाच्या नावे परत करण्याचे आदेश दिल्यानंतरही तब्बल नऊ वर्षे फेरफार न झाल्याचा आरोप इंगळे यांनी केला. या प्रकरणात समितीच्या पाठपुराव्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, सावकारी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांच्या बैठका नियमित घेणे आवश्यक असल्याचे समितीचे म्हणणे आहे. १ मार्च २०१७ व १७ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार दर तीन महिन्यांनी आढावा बैठका घेण्याची सक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांना काही बाबतीत दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.समितीच्या म्हणण्यानुसार, कलम १८ अंतर्गत अवैध सावकारी व्यवहारातून झालेल्या जमीन व्यवहारांबाबत आदेश देण्याची प्रक्रिया सहकार विभागाच्या यंत्रणेमार्फत राबविली जाते. मात्र, या आदेशांची महसूल अभिलेखात प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना शेतकऱ्यांना तलाठी व मंडळ अधिकारी स्तरावर अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा समितीने केला आहे.

» महसूल विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांची मंत्रालय स्तरावर आढावा नावा बैठक घेऊन सावकारी कायद्यातील आदेशांची महसूल यंत्रणेकडून तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र परिपत्रक काढावे. तसेच शेतकऱ्यांनी तक्रारी कुठे आणि कोणत्या अधिकाऱ्याकडे दाखल कराव्यात, याबाबत स्पष्ट मार्गदर्शन करावे.

**अरुण इंगळे, अध्यक्ष,**
सावकारग्रस्त शेतकरी समिती

## बार्शीटाकळी शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरु



प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**बार्शीटाकळी :** शहरातील अतिक्रमणे हटविण्या साठी नगर पंचायतच्या वतीने अतिक्रमण निर्मूलन मोहीम सुरू करण्यात आली आहे. 29 सप्टेंबरपासून सुरू झालेली ही मोहीम 30 सप्टेंबर व 1 ऑक्टोबर रोजीही सुरू राहणार असल्याची माहिती नगर पंचायत चे मुख्याधिकारी राहुल कंकाळ यांनी दिली आहे.

या मोहिमेची सुरुवात जुने न्यायालय परिसरा पासून करण्यात आली असून, खडकपुरा चौका पर्यंत मुख्य रस्त्या वरील अतिक्रमणे पोकलँड व जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आली. कारवाई दरम्यान काही नागरिकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून नगर पंचायत ला सहकार्य केले.तसेच उर्वरित अतिक्रमणे नगर पंचायतीच्या पथकाने हटविली.

या कारवाईसाठी परिविक्षाधीन पोलिस उप अधीक्षक आनंद कांदे, मुख्याधिकारी राहुल कंकाळ, नायब तहसीलदार अक्षय नागे, पोलिस उपनिरीक्षक पवार, नगर अभियंता संकेत तालकोकुलवार, कार्यलय अधिक्षक विनोर बोरकर, अनिकेत कटारे, रुपेश पिंजरकर आदिल शेख यांच्यासह नगर पंचायतचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कारवाईच्या पार्श्वभूमीवर पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. यामध्ये पोलिस उपनिरीक्षक, पोलिस शिपाई तसेच दंगा नियंत्रण पथकाचा समावेश होता. नगर पंचायत कडून पोकलँड, जेसीबी, दोन ट्रॅक्टर व सफाई कर्मचारी या मोहिमे साठी तैनात करण्यात आले होते. संपूर्ण कारवाई शांततेत पार पडली असून नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य केले.

30 सप्टेंबर रोजी खडकपुरा चौक ते खोलेश्वर मंदिर रोडवरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. नागरिकांनी आपली अतिक्रमणे स्वतःहून काढून घेऊन नगरपंचायत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी राहुल कंकाळ यांनी केले आहे.

## 1 ऑक्टोबरपासून तिकीट 'एनसीएमसी' कार्डद्वारेच

**अकोला :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध सवलत योजनांचा लाभघेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. सवलतीचे तिकिट देताना 'एनसीएमसी' कार्डचा वापर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून, कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया राज्यभरातील एसटी आगार आणि बसस्थानकांवर सुरू करण्यात आली आहे. एसटी महामंडळाकडून शासनाच्या निर्देशानुसार विविध सामाजिक घटकांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा दिली जाते.

## महापालिकेच्या नो हॉकर्स झोनमध्ये कारवाई

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला:** शहरात मनपा प्रशासनाने नो हॉकर्स मार्गावर मोठी कारवाई केली आहे. २३ रस्त्यांवर फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास मनाई असून, आज पूर्व झोनमध्ये अवैध अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्य रस्ते आणि चौकांमध्ये पथविक्रेते व फेरीवाल्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना रहदारीस आणि पायी चालताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल घेत, पोलीस अधीक्षकांच्या पत्रानुसार आणि महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार शहरातील तब्बल २३ मार्गांवर पथविक्रेत्यांना व्यवसाय करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर, आज मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि सहायक आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्व झोन अंतर्गत येणाऱ्या रतनलाल प्लॉट ते उमरी स्मशानभूमीपर्यंतच्या परिसरामध्ये धडक कारवाई करण्यात आली. रस्त्यावरील किरकोळ व्यावसायिक आणि दुकानदारांनी दुकानांसमोर वाढवलेले अतिक्रमण मनपाच्या पथकाने निष्कासित केले. या कारवाईमुळे नागरिकांचा रस्ता मोकळा झाला असून, यापुढेही अशा प्रकारची कारवाई तीव्र केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## शिवणीत चाकू हल्ला; फैजान अलीची हत्या

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत शिवणी येथील डोंगरे नगर परिसरात दोन गटांमध्ये झालेल्या वादाला हिंसक वळण लागले. चाकू हल्ल्यात सैयद फैजान सैयद अली याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी रात्री घडली. या हल्ल्यात त्याचा साथीदार उजैफ खान हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शिवणी येथील डोंगरे नगर परिसरात दोन गटांमध्ये काही कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि त्यानंतर चाकूने हल्ला करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्यात सैयद फैजान सैयद अली याच्या शरीरावर गंभीर वार झाले.



रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या फैजानला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेत उजैफ खान हा देखील गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याचे कळते. घटनेची माहिती मिळताच ए म आ य ड ी स ी पोलीस स्टेशनचे ठाणेदार विजय जाधव यांच्यासह पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत घटनेची माहिती घेण्यास सुरुवात केली. परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. दरम्यान, फैजान अली याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे समजताच त्याचे नातेवाईक आणि परिचित मोठ्या संख्येने रुग्णालयात जमा झाले. संतप्त नातेवाइकांनी या घटनेचा निषेध करीत हंगामा केला. परिस्थिती तणावपूर्ण बनल्याने पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला. हल्लेखोरांचा शोध सुरू केला. या हत्येतील मुख्य आरोपीला जिल्हा रुग्णालयात आणल्याची माहिती मिळताच संतप्त जमावाने त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. त्यामुळे रुग्णालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनेनंतर डोंगरे नगर परिसरासह शासकीय रुग्णालय परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## महाविद्यालयात तरुणीवर चाकू हल्ला

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अमरावती:** बडनेरा शहरातील एका महाविद्यालयात 19 वर्षे तरुणीवर चाकूने जीवघेणा हल्ला महाविद्यालयाच्या परिसरात झाला. ही घटना दुपारी दीड ते दोन वाजताच्या सुमारास घडली. महाविद्यालयाच्या लॉबीमध्ये पायऱ्यावर ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार आरोपी नवीन मद्राज वनवानी वय 19 रा. सिंधी कॅम्प नवी वस्ती बडनेरा याने चाकून हल्ला केल्याचे नाव समोर आले आहे.

तरुणी नांदगाव खंडेश्वर येथील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे माहितीनुसार तरुणी महाविद्यालयाच्या लॉबी



मधून प्रॅक्टिकल परीक्षा देऊन पायावरून जात असताना आरोपीने पाठीमागून येत अचानकपणे तिच्यावर चाकूने हल्ला केला परिसरात गोंधळला घटनेनंतर विद्यार्थ्यासह महाविद्यालयातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले अत्यंत आरोपी पळत असल्याची दिसत येथील सुरक्षारक्षकांनी त्याला पकडले. आरोपीला चांगलाच चोप देण्यात आला. येथील नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी दिला त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व आरोपीला ताब्यात घेतले. महाविद्यालयामध्ये पोलीस आयुक्त राकेश ओला पोलीस, उपायुक्त शाम घुगे पोलीस, उपायुक्त यशवंत सोळंके पोलीस उपयुक्त प्रांजली सोनवणे एसीपी ब्राह्मणे यांनी घटनास्थळी भेट दिली .

## वाशिम शहराजवळील एका पेट्रोल पंपावर धाडसी चोरी

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**वाशिम:** शहराजवळील गजानन पेट्रोलियम या पेट्रोल पंपावर एका चोरट्याने हजारो रुपयांची चोरी केल्याची घटना समोर आली आहे.विशेष म्हणजे, कॅबिनमध्ये दोन कर्मचारी झोपलेले असतानाही त्यांना या चोरीची कोणतीही चाहूल लागली नाही.ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून पोलिसांकडून चोरट्याचा शोध सुरू आहे. वाशिम शहराजवळील गजानन पेट्रोलियम या पेट्रोल पंपावर आज पहाटेच्या सुमारास चोरीची धाडसी घटना घडली. सकाळी सहा वाजताच्या दरम्यान एक चोरटा पेट्रोल पंपाच्या कॅबिनमध्ये शिरला. कॅबिनमधील टेबलखाली ठेवलेल्या चावीच्या साहाय्याने त्याने लॉकर उघडला आणि त्यामधील हजारो रुपयांची रोकड चोरून नेली.

विशेष बाब म्हणजे, चोरी झाली त्या वेळी कॅबिनमध्ये दोन कर्मचारी झोपलेले होते. मात्र चोरट्याने अतिशय शांतपणे चोरी केल्यामुळे कर्मचाऱ्यांना याची कुठलीही चाहूल लागली नाही. चोरी उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. ही संपूर्ण घटना पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## विजेच्या तारांवर चढून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीचे शेख सोहेलने प्राण वाचवले





प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला:** येथील टॉवर चौकात एक व्यक्ती विजेच्या तारांवर चढून आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात होता. जोराने झोके घेत होता तसेच तारांवर चालत होता.

हा प्रकार पाहून मंगळवारी रात्री टॉवर चौकात गर्दी जमली होती. या ठिकाणी आलेल्या शेख सोहेल नामक युवकाने आपला जीव धोक्यात घालून त्याला सुखरूप उतरवले तसेच त्याचे प्राण वाचवले. उपस्थितांनी सोहेल याच्या धाडसीपणाचे कौतुक केले. तसेच त्याला शाबासकी दिली.आम्ही टॉवर चौकात चहा घेण्यासाठी आलो होतो तेव्हा एक व्यक्ती विद्युत तारांवर चढलेली दिसून आली. त्याला वाचवणे महत्त्वाचे असल्याने आपण मानवीय दृष्टीकोनातून पुढाकार घेतला असे शेख सोहेल याने माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. त्या व्यक्तीबाबत काही माहिती मिळाली नाही असे देखील सांगितले.

## कलावती हॉस्पिटलचा शानदार लोकार्पण सोहळा

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला :** डॉ. राहुल तुळशिरामजी लाखे एमबीबीएस., एमएस(OBGY), डीएनबी अ‍ॅडव्हान्स लॅप्रोस्कोपिक सर्जन ऑब्सटेट्रिशियन आणि गायनॅकोलॉजिस्ट डॉ. कांचन राहल लाखे) B.PTh., M.PTh. Consulting Physio-therapist यांच्या कलावती हॉस्पिटलचा शानदार शुभारंभ झाला.

आयव्हीएफ, एन्डोस्कोपी, मॅटर्निटी, फिजिओथेरपी आणि रिहॅबिलिटेशन सेंटर या अद्ययावत सुविधेसह रुग्णसेवेसाठी अकोला येथील रामदासपेठ मधील अरविंद घोष मार्गावर नवीन जागेत रामदास पेठ, येथे स्थानांतरण व लोकार्पण सोहळा संपन्न झाला.लोकार्पण सोहळ्या करिता प्रमुख अतिथी म्हणुन डॉ. आशिष सातव सामाजिक कार्यकर्ते, अध्यक्ष, महान ट्रस्ट, मुख्य वैद्यकीय अधिकारी, महात्मा गांधी आदिवासी रुग्णालय, मेळघाट. तसेच डॉ. रणजित सपकाळ, संचालक, महाबिज अकोला, डॉ. प्रशांत भांबरे, प्रख्यात लॅप्रोस्कोपिक सर्जन, मुंबई, डॉ. आनंद भालेराव प्राध्यापक, बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे, माधव मुंशी प्राचार्य, न्यू इंग्लीश हायस्कूल, अकोला, डॉ. निलेश कोरडे, संचालक ओझोन हॉस्पिटल आदी मान्यवर व्यासपिठापर उपस्थित




होते. कलावती हॉस्पिटलच्या या शुभप्रसंगी आमदार रणधीरजी सावरकर, डॉ. रश्मी जिराफे, डॉ. शिवानी साकरकर, डॉ. शिवांगी चांडक व इतर मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झालीत. या सोहळ्याकरीता शैक्षणिक, सामाजिक, अध्यात्मिक, वैद्यकीय व राजकीय क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती व आप्तस्वकियांची उपस्थिती होती.

डॉ. राहुल तुळशिरामजी लाखे यांनी आता पर्यंत १६,००० हून अधिक लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केल्या आहेत. AMOGS २०२५ तर्फे सर्वोत्कृष्ट युवा शल्यचिकित्सक पुरस्काराने सन्मानित, राष्ट्रीय परिषद आणि CME मध्ये ऑपरेटिंग फॅकल्टी व वक्ता म्हणून आमंत्रित, इंडियन असोसिएशन ऑफ गायनॅकॉलॉजिकल एंडोस्कोपिस्ट्स (महाराष्ट्र शाखेचे) सदस्य, IAGE च्या युवा परिषदेचे सदस्य, FOG-SI - IAGE ईगल पुरस्काराचे मानकरी, उच्च जोखमीच्या व गुंतागुंतीच्या प्रसूती आणि स्त्रीरोग रुग्णांसाठी संदर्भ उपचार केंद्र. कलावती हॉस्पिटलचा मागील १० वर्षापासुन रुग्ण सेवत आहे. अत्याधुनिक लॅप्रोस्कोपी सुविधा 3D 4K लॅप्रोस्कोपी स्टोर्झ, रुबिना अकोल्यातील प्रथमच स्थापना प्रजननक्षमता व IVF क्लिनिक आधुनिक IVF प्रयोगशाळा अत्याधुनिक प्रसूती सेवा व लेबर रूम फिजिओथेरपी व पुनर्वसन केंद्र प्रशस्त डिलक्स रूम उत्तम वातावरण तसेच अधिक सुविधा अधिक चांगली आरोग्यसेवा उपलब्ध आहेत.

## अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्यावर धडक कारवाई

प्रतिनिधी ३० सप्टेंबर

**अकोला:** शहरात चांदेकर चौकात नाकाबंदी करीत असताना एक इसम संशयितरित्या मोटरसायकल चालवताना दिसला. त्याला थांबून मोटरसायकलची पाहणी केली असता एका पिवळ्या पोत्यात प्रतिबंधित गुटखा , सुगंधित सुपारी , पान मसाला आढळला. प्रफुल लांडे केशवनगर गोरक्षण रोड अकोला असे नाव सांगितले. 80 हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर इसमाविरुद्ध पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे गुन्हा नोंद करण्यात आला. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक



बी. चंद्रकांत रेडी , उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पाटील , पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष गावंडे, कबीर अन्सारी , ऋषभ शर्मा , उमेश वाघमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135